cmyk

## संपादकीय

### आजच्या पिढीला घृणा येईल असे वागू नका !

अनेक लोकप्रतिनिधींवर गंभीर गुन्हे दाखल असल्याचा निष्कर्ष असोसिएशन फॉर डेमॉक्रेटीक रिफॉर्म्सच्या अहवालात नमूद असल्याचे वृत्त माध्यमात प्रसिद्ध झाले आहे. 'जे आडातच नाही ते पोहऱ्यात तरी कसे येईल' असा याचा एक अर्थ काढला जाऊ शकतो. अर्थात, असे नमुने लांब फेकण्याची जबाबदारी मतदारांना घ्यावीच लागेल. लोकप्रतिनिधीची अपप्रवृत्ती पोसण्यात सगळेच पक्ष आघाडीवर आहेत.

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com

### ऐन दिवाळीला वीज दरवाढीचा शॉक

मुंबई : राज्यातील जनतेचे वीज बील पुढील पाच वर्षात कमी कमी केले जाईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत जाहीरपणे सांगितले होते पण मुख्यमंत्री यांनी आपल्याच शब्दाला बगल देत वीज बील महाग केले आहे. दिवाळीच्या तोंडावर केलेली ही वीज दरवाढ सर्वसामान्यांवर टाकलेला बोझा आहे, अशी टीका महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केली आहे. वीज दर स्वस्त करण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासन हा जुमला ठरला असून इंधन समायोजनाच्या नावाखाली भाजप महायुती सरकारने जनतेला वीज महागाईचा शॉक दिला आहे. या दरवाढीमुळे १०० युनिटपर्यंत वीज वापर करणाऱ्या सर्वसामान्य ग्राहकालाही या दरवाढीचा फटका बसणार आहे.

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१६१ | मंगळवार, दि.०७ ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### नेपाळमध्ये भुस्खलन; ५५ जणांचा मृत्यू

काठमांडू : नेपाळच्या विविध भागांत शनिवारी रात्रीपासूनच मुसळधार पावस सुरू असून यामुळे झालेल्या भूस्खलनामुळे आणि आलेल्या पुरांमुळे मोठे नुकसान झाले आहे. या आपत्तीत किमान ५५ जणांचा मृत्यू झाला असून अनेकजण बेपत्ता झाल्याचे वृत्त आहे.सशस्त्र पोलिस दलाचे प्रवक्ते कालिदास धौबाजी यांनी दिलेल्या माहितीनुसार, कोशी प्रांतातील इल्लम जिल्ह्यात गेल्या ४८ तासांत झालेल्या मुसळधार पावसामुळे झालेल्या भूस्खलनात किमान ५५ जणांचा मृत्यू झाला.

### लेह हिंसेची न्यायालयीन चौकशी व्हावी

जोधपूर : लेह हिंसाचारात झालेल्या चार जणांच्या मृत्यूची स्वतंत्र न्यायालयीन चौकशी करण्याची मागणी सोनम वांगचुक यांनी केली आहे. त्यांनी जोधपूर मध्यवर्ती कारागृहातून एक पत्र लिहिले, जे रविवारी सोडण्यात आले.ज्यांनी आपला जीव गमावला त्यांच्या कुटुंबियांविषयी मी मनापासून संवेदना व्यक्त करतो. जखमी आणि अटक झालेल्यांसाठी मी प्रार्थना करतो. चार जणांच्या मृत्यूची चौकशी स्वतंत्र न्यायिक आयोगाकडून झाली पाहिजे. जोपर्यंत ते होत नाही तोपर्यंत मी तुरुंगातच राहणार आहे. हे पत्र लेह एपेक्स बॉडीचे कायदेशीर सल्लागार यांनी शेअर केले होते.

### शिंदे करणार कार्तिक एकादशी महापूजा

मुबई : सध्या राज्याला दोन उपमुख्यमंत्री आहेत, अजित पवार आणि एकनाथ शिंदे, त्यामुळे यंदा विठ्ठल रुक्मिणी यांच्या महापूजेचा मान कोणाला मिळणार? एकनाथ शिंदे यांच्या हस्ते महापूजा होणार की अजित पवार यांच्या हस्ते? याबाबत उत्सुकता निर्माण झाली होती. मात्र आता ही उत्सुकता संपलेली आहे. यंदा हा मान राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मिळाला आहे.दरवर्षी आषाढी आणि कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूरमध्ये श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा करण्यात येते. आषाढी एकादशीला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विठ्ठलाची शासकीय महापूजा होते.

### परभणी जिल्ह्यात मुसळधार पाऊस

परभणी : आठ दिवसांची विश्रांती घेतल्यानंतर परभणी जिल्ह्यात पुन्हा एकदा पावसाचा हाहाकार बघायला मिळाला आहे. जिल्ह्यातील अनेक भागात पहाटे झालेल्या मुसळधार पाऊस झाला असून या पावसामुळे शहरातील अनेक भागांमधील रस्त्यांसह ग्रामीण भागातील शेत शिवारही पाण्याखाली गेली आहेत. तर अनेकांच्या घरात पाणी शिरल्याचे चित्र पुन्हा एकदा निर्माण झाले आहे.दोन आठवडे सतत पाऊस राहिल्याने जिल्ह्यातील अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाल्याचे पाहण्यास मिळाले होते.

### पाकिस्तानविरुद्ध भारताचा दणदणीत विजय

कोलंबो : महिला वनडे वर्ल्डकपमध्ये आज भारतीय महिला क्रिकेट संघाने पाकिस्तानच्या महिला क्रिकेट संघाला १५९ धावांवर बाद करत मोठा विजय मिळवला. भारताने हा सामना ८८ धावांनी जिंकला.भारताने प्रथम फलंदाजी करताना २४७ धावा केल्या होत्या. पाकिस्तानला विजयासाठी २४८ धावा करायच्या होत्या. मात्र, भारताच्या गोलंदाजांपुढे पाकिस्तानचा संघ १५९ धावांवर बाद झाला. भारताने पाकिस्तानविरुद्ध सलग १२ वेळा विजय मिळवला. भारत या विजयासह गुणतालिकेत पहिल्या स्थानावर पोहोचला तर पाकिस्तान सहाव्या स्थानावर आहे.

### शाह आले पण मदतीबाबद शब्दही बोलले नाहीत

नागपूर : महाराष्ट्रात अस्मानी व सुलतानी संकटाने बळीराजा उद्ध्वस्त झाला आहे, पण भाजप महायुती सरकारने अद्याप दमडीचीही मदत दिली नाही. सरकारने फक्त कोरड्या घोषणा केल्या. रविवारी केंद्रीय गृहमंत्री तथा सहकार मंत्री महाराष्ट्रात एका कार्यक्रमाला आले पण शेतक–यांच्या संकटावर व मदतीवर एक शब्द बोलले नाहीत. राज्याचे मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्री अमित शाह यांच्यासमोर हतबल झाले.अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

# ऐन दिवाळीत परतीचा पाऊस धुमाकूळ घालणार

मुंबई । प्रतिनिधी

**ऑक्टोबर महिन्याला सुरूवात झाली. मान्सूनने अद्याप तरी पूर्णपणे निरोप घेतलेला नाही. अजूनही काही भागांत रिमझिम पाऊस बरसतो आहे. गेल्या महिन्यात राज्यातील मराठवाड, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्राला पावसाने झोडपून काढले. यामुळे शेतक–यांचे प्रचंड नुकसान झाले. उभी पिकं डोळ्यांसमोर वाहून गेली. मात्र, परतीचा पाऊस अजूनही**



**पूर्णपणे गेलेला नाही. १२ ऑक्टोबरला परतीच्या पावसाला सुरूवात होणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे दिवाळीत पाऊस बरसेल की काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे.**

मागील महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने संपूर्ण मराठवाडा सोलापूर कडील काही भागात पावसाने हाहाकार माजवला शेतकऱ्याचे शेतातील पिकाची माती झाली सोयाबीनचा चिखल तर कापसाच्या वातीझाल्याने शेतकरी मेटाकुटीस आला आहे त्यातच पूरपरिस्थिती निर्माण झाल्याने बीड जिल्ह्यातील गोदावरी पट्ट्यात अनेक गावांना स्थलांतरित करावे लागले होते हि भीती आजही कायम असताना पुन्हा परतीचा पाऊस येण्याची शक्यता वर्तवली जात असल्याने पुन्हा भीती निर्माण झाली आहे गोवा, कोकण, दक्षिण किनारी गुजरात ▶▶ पान २ वर

# राज्यातील नगरपालिका नागरपंचायतेत महिला राज

## २४७ नगरपालिका, १४७ नगरपंचायतींच्या नगराध्यक्षपदाची सोडत जाहीर

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील सर्व राजकीय पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारी २०२६ पूर्वी निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाला वेगाने कामाला लागले आहे. या पार्श्वभूमिवर राज्यातील २४७ नगरपालिका आणि १४७ नगरपंचायतींच्या नगराध्यक्षपदांची आरक्षण सोडत आज (६ ऑक्टोबर) जाहीर करण्यात आली.

मंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील परिषद सभागृहात २४७ नगरपालिका आणि १४७ नगरपंचायतींच्या नगराध्यक्षपदांची सोडत काढण्यात आली. यावेळी ३३ नगरपरिषदांपैकी १६ नगरपरिषदांसाठी अनुसूचित जाती महिला आरक्षण जाहीर झाले आहे. ही निवडणूक मिनी विधानसभा निवडणूक मानली जाते. या आरक्षणाच्या निमित्ताने नगरपरिषदांमध्ये महिलाराज येणार आहे. या सोडतीला विविध राजकीय



पक्षाचे पदाधिकारीदेखील उपस्थित होते. ६८ नगरपरिषदा खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव– परळी वैजनाथ ,खेड अंबरनाथ ,चलपूर, मुदखेड ,पवनी , कन्नड , मलकापूर, कोल्हापूर, मोवाड ,पंढरपूर ,खामगाव, गंगाखेड ,धरणगाव ,बार्शी , अंबड, गेवराई , म्हसवड, गडचिरोली, डारा, उरण, बुलढाणा, पैठण, कारंजा, नांदूरा ,सावनेर, मंगळवेढ ,कलमनूरी– ,आर्वी ,किनवट ,कागल–,संगमनेर , मुरगुड , साकोली, कुरुंदवाड, पूर्णा, कळंब , चांदूररेल्वे ,चांदूरबाजार,भूम रत्नागिरी, रहिमतपूर, खेड, करमाळा, वसमत, हिंगणघाट, रावेर , जामनेर, पलुस, यावल, सावंतवाडी, जव्हार, तासगाव, राजापूर, सिंदीरेल्वे ,जामखेड , चाकण, शेवगाव, लोणार–, ▶▶ पान २ वर

# बीड जिल्ह्यातील आरक्षण चित्र

बीड । प्रतिनिधी

**राज्यातील नगरपालिकांच्या अध्यक्षपदाची सोडत सुरु असून बीड नगरपालिकेचे नगराध्यक्षपद अनुसूचित जातीच्या महिलेसाठी झाले आहे . आणखी इतर प्रवर्गाचे आरक्षण सुरु असून सुरुवातीला अनुसूचित जातींसाठी अधिसूचित नगरपालिकांची यादी जाहीर करण्यात आली. यात बीड ला अनुसूचित महिला आरक्षण जाहीर झाले आहे.**

तर ओबीसी प्रवर्गात माजलगाव ओबीसी महिला आणि अंबाजोगाई ओबीसी आरक्षण असणार आहे. , धारूर , परळी नगरपालिका खुल्या प्रवर्गासाठी असून यात गेवराई ,परळीमध्ये खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षण असणार आहे.

**अनुसूचित जाती महिला : बीड**
**ओबीसी महिला : माजलगाव**
**ओबीसी : अंबाजोगाई**
**सर्वसाधारण महिला : परळी,गेवराई, सर्वसाधारण :धारूर**

# बीडच्या जेलमध्ये धर्मांतरणासाठी लाखो रुपयांची ऑफर–आ.गोपीचंद पडळकर

सांगली । प्रतिनिधी

**भाजपचे आमदार गोपीचंद पडळकरांनी बीडचे कारागृह अधीक्षकांवर आरोप केला आहे. बीडच्या जेलमध्ये धर्मांतराचे काम होते, सगळ्या महापुरुषांचे फोटो काढून त्या ठिकाणी बायबलमधील श्लोक लिहिल्याचा आरोप पडळकरांनी केला. जेलमधील कीर्तन बंद करण्यात आलं. तर कैद्यांना धर्मांतरासाठी लाखो रुपयांचे आमिष दाखवले जात असल्याचा आरोप पडळकरांनी केला. आमदार गोपीचंद पडळकर आणि आमदार सदाभाऊ खोत यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली आणि या प्रकरणाची तपासणी करण्याची मागणी केली.**



गोपीचंद पडळकर म्हणाले की, ''बीडचे जे तुरुंग अधिकारी आहेत तिकडे ते धर्मांतराचं काम करत आहेत. तिकडे छत्रपती शिवाजी महाराज आणि गणपतीची मूर्ती होती, ती काढून टाकलेली आहे. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो, महात्मा गांधींचा फोटो काढून टाकलेला आहे. ते सर्व फोटो एका खोलीत टाकलेले आहेत. जेलमध्ये सगळे बायबल मधले श्लोक लिहिले आहेत. कैदी जेलमध्ये भजन कीर्तन करायचे, ते भजन कीर्तन पूर्णपणे बंद करून टाकलेल आहे. तसेच तिकडे त्या अधिकाऱ्याला भेटायला एक पादरी भेटायला येतो. कैद्यांना तुम्ही धर्मांतर करा तुम्हाला ▶▶ पान २ वर

# शरद पवारांनी मराठ्यांचं वाटोळं केलं–मनोज जरांगे

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

**मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन मनोज जरांगे यांनी पहिल्यांदाच शरद पवारांवर टीका केली आहे. १९९४ साली शरद पवारांनी आमच्या हक्काचं १६ टक्के आरक्षण ओबीसींना दिलं आणि आमचं वाटोळं केलं अशी टीका जरांगे यांनी केली. तसेच ज्या शरद पवारांनी ओबीसींना आरक्षण दिलं, त्यांचे सुद्धा उपकार ओबीसी नेत्यांनी ठेवलं नसल्याची टीकाही जरांगे यांनी केली.**



ओबीसींच्या नेत्यांनीच ओबीसी समाजाचं वाटोळं केल्याचं बोलत असताना मनोज जरांगे यांनी शरद पवारांवरही टीका केली. १९९४ साली देण्यात आलेल्या ओबीसी आरक्षणामुळे मराठ्यांचं वाटोळं झाल्याचं ते म्हणाले.मनोज जरांगे म्हणाले की, ''ओबीसी समाजाला १९९४ साली देण्यात आलेलं आरक्षण हे मराठ्यांच्या हक्काचं होतं. आमचं १६ टक्के आरक्षण आम्हाला मिळणार आहे. पण ज्यांनी ओबीसींना आरक्षण दिलं त्या शरद पवारांचे उपकार ओबीसी नेत्यांना नाहीत. शरद पवारांनी आमचं तर वाटोळंच केलं. १९९४ साली आमचं आरक्षण शरद पवारांनी ओबीसींना दिलं.मनोज जरांगे यांनी मराठा समाजाच्या आरक्षणासाठी या आधी अनेकदा आंदोलनं केली. या आंदोलनांना शरद पवारांचा छुपा पाठिंबा असल्याचा आरोप अनेकदा ▶▶ पान २ वर

# ओबीसी आरक्षण लढा सुरुच राहील–विजय वडेट्टीवार

मुंबई । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाचा जीआर निघाल्यापासून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि राज्यातील ओबीसी नेत्यांमध्ये जंगलीच जुंपली असल्याचे चित्र आहे. त्यातच दोन्ही बाजूने रोज नव्या आरोप–प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. अशातच आता या शाब्दिक वादाने टीकेचे टोक गाठले आहे का असा प्रश्न पडू लागला आहे. आमचा



जीव गेला तरी चालेल. मात्र ओबीसी आरक्षण लढा सुरुच राहील. आम्ही लिहून ठेवू, जीव गेला तर जरांगेला फाशी द्या' असे म्हणत विजय वडेट्टीवार यांनी पुन्हा एकदा जरांगे पाटील यांना डिवचलं आहे.

२ सप्टेंबरच्या शासन आदेशाच्या विरोधात बोलणा–यांना विरोध करा, असे जर मनोज जरांगे यांचे म्हणणे असेल ▶▶ पान २ वर

# बिहारच्या निवडणुका दोन टप्प्यात

## ६ आणि ११ नोव्हेंबरला मतदान, तर १४ ला निकाल

नवीदिल्ली । वृत्तसंस्था

अवघ्या देशाचे लक्ष लागून असलेल्या बिहार निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाचे प्रमुख ज्ञानेश कुमार यांनी बिहारच्या निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या. बिहारच्या निवडणुका या दोन टप्प्यात होणार आहेत. पहिल्या



टप्प्यातील मतदान हे ६ नोव्हेंबर रोजी, तर दुसऱ्या टप्प्यातील मतदान हे ११ नोव्हेंबर रोजी होणार आहे. या निवडणुकीचा निकाल १४ नोव्हेंबर रोजी होणार आहे.


पहिल्या टप्प्यातील निवडणूक ही ६ नोव्हेंबर रोजी होणार आहे. तर दुसऱ्या टप्प्यासाठी ११ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी १० ऑक्टोबर आणि १३ ऑक्टोबर ▶▶ पान २ वर

# एन दिवाळीत आनंदाचा शिधा' योजना बंद?

मुंबई । प्रतिनिधी

**दिवाळीला अवघे १२ दिवस बाकी असताना 'आनंदाचा शिधा' देण्यात आलेला नाही. त्यामुळे शिवभोजन थाळी ही योजना जवळपास बंद पडल्याची चर्चा सुरू असतानाच आता 'आनंदाचा शिधा' ही लोकप्रिय योजना देखील बंद पडण्याच्या मार्गावर आहे.**

राज्यातील गोरगरिब जनतेला सणासुदीचे दिवस आनंदाने साजरे करता यावेत, यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रेशनकार्ड




धारकांसाठी आनंदाचा शिधा ही योजना तीन वर्षांपूर्वी सुरू केली होती. मात्र यंदा राज्य सरकारकडून गणेशोत्सवात आनंदाचा शिधा वितरित करण्यात आलेला नाही. त्यातच आता दिवाळीला अवघे ११ दिवस बाकी असताना आनंदाचा शिधा ▶▶ पान २ वर

### अनेक योजनांना घरघर

दरम्यान, शिवभोजन थाळी आणि आनंदाचा शिधासह इतर योजना बंद होणार असल्याचा आरोप विरोधक करताना दिसत आहेत. तर दुसरीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोणत्याही योजना बंद केल्या जाणार नाहीत, असे अनेकदा जाहीर केले. मात्र अनेक योजनांसाठी निधीच न देण्याचे धोरण राज्य सरकारने स्वीकारले आहे.

### १०० रुपयांत शिधा

दसरा दिवाळी या उत्सवांच्या काळात रेशनच्या दुकानांवर आनंदाचा शिधा लाभार्थ्यांना दिला जातो. पांढरे रेशन कार्ड धारकांना आनंदाचा शिधाचे लाभ मिळत नाही. इतरांना १ किलो पाम तेल, चणा डाळ, रवा आणि साखर मिळते. फक्त १०० रूपयांत हे किट मिळते. ही योजना सुरू झाल्यानंतर अवघ्या ७२ लाख शिधापत्रकारींनी या योजनेचा लाभ घेतला.

# सरन्यायाधीशांवर बूट फेकण्याचा प्रयत्न

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीदरम्यान आज धक्कादायक घटना घडली. एका वकिलाने सरन्यायाधीश गवई यांच्यावर वस्तू फेकली, सुनावणीदरम्यान एका वकिलाने भारताचे सरन्यायाधीश बी.आर. गवई यांच्यावर वस्तू फेकण्याचा प्रयत्न केला. वृत्तानुसार, त्या व्यक्तीने न्यायालयात घोषणाबाजी देखील केली. नंतर सुरक्षा कर्मचा–यांनी त्याला बाहेर काढले, ज्यामुळे काही काळ न्यायालयीन कामकाजात व्यत्यय आला.**

'लाईव्ह लॉ' वेबसाइटनुसार, न्यायालयात उपस्थित असलेल्या लोकांनी सांगितले की, संबंधिताने 'हिंदुस्थान सनातन धर्माचा अपमान सहन करणार नाही', ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०६ ऑक्टोबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७९.५० क्विंटल | २,२०१ | २,८०० | २,५५१ |
| ज्वारी/हायब्रिड : १५८.०० क्विंटल | १,९०० | २,८५० | २,३६५ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ०.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| उडीद : ४१.५० क्विंटल | ३,६०० | ५,३०० | ५,००३ |
| बाजरी: ११७.०० क्विंटल | २,००० | २,८६१ | २,५५१ |
| मुग: २.५० क्विंटल | ४,८०१ | ६,४०० | ५,६०० |
| सोयाबीन: ४३०.०६ क्विंटल | २,८०० | ४,२५० | ३,५८५ |
| हरभरा: ८.५० क्विंटल | ४,४०० | ६,४०१ | ५,०३३ |

cmyk

cmyk



## अग्रलेख

# आजच्या पिढीला घृणा येईल असे वागू नका !

अनेक लोकप्रतिनिधींवर गंभीर गुन्हे दाखल असल्याचा निष्कर्ष असोसिएशन फॉर डेमॉक्रेटीक रिफॉर्म्सच्या अहवालात नमूद असल्याचे वृत्त माध्यमात प्रसिद्ध झाले आहे. 'जे आडातच नाही ते पोहऱ्यात तरी कसे येईल' असा याचा एक अर्थ काढला जाऊ शकतो. अर्थात, असे नमुने लांब फेकण्याची जबाबदारी मतदारांना घ्यावीच लागेल. लोकप्रतिनिधीची अपप्रवृत्ती पोसण्यात सगळेच पक्ष आघाडीवर आहेत. किंबहुना अशा वाचाळवीरांची फौज पदरी बाळगणे ही सगळ्याच पक्षांची अपरिहार्यता असावी. पण त्याचे मोल मात्र लोकशाही, समाज आणि लोकांना चुकवावे लागते. याचा आणखी एक गंभीर दुष्परिणाम होतो. राजकारणाची महत्वाकांक्षा असणारी आणि सध्या राजकारणात असलेली युवा पिढी हेच राजकारण बघते. सभ्य राजकारणाचे आदर्श त्यांनी फारसे पाहिलेले नाहीत. त्यामुळे प्रसंगी पातळी सोडून एकमेकांचा पाणउतारा करण्यालाच ते राजकारण समजू लागतील. राजकारणात सभ्यता नसली तरी चालेल असेच त्यांना वाटू लागेल. असे घडणे जास्त चिंताजनक आणि भितीदायक आहे.

दिवसेंदिवस राजकारण लोकांसाठी अधिकाधिक उद्वेगजनक होत चालले आहे. सभ्यता, साधनशुचिता, मर्यादा आणि आदर कोळून प्यायचा असेच सर्वांनी ठरवले असावे. राजकारणात एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढणे लोक एकवेळ समजू शकतात पण त्यासाठी किती पातळी सोडावी? जे आता लोकांमधून कायमचे निघून गेले आहेत त्यांचाही राजकीय स्वार्थासाठी वापर करावा? जनाची नाही तर निदान मनाची तरी वाटायला हवी. पण तेवढाही विवेक कोणाजवळच उरला नसावा. आपण कोण आहोत? आपल्यावर घटनेने कोणती जबाबदारी सोपवली आहे? आपण काय बोलतो? कोणाला बोलतो? कसे बोलतो? याचा विचार ना बोलणाऱ्यांना करावासा वाटत आणि ना त्यांनी तो करावा किंवा त्यांना तो तसा करायला भाग पाडावे असे त्यांच्या त्यांच्या अध्वर्यूंना वाटत. अन्यथा उचलली जीभ आणि लावली टाळ्याला अशा बोलभांडांच्या तोंडाला वरिष्ठांनी लगाम लावल्याचे लोकांना दिसले असते. येता जाता घटनेचे दाखले देत फिरायचे आणि राजकीय टीका करताना माणूसपणही विसरायचे असा दुटप्पीपणा सगळेच अंगीकारत आहेत. ज्या नेत्यांचा वारसा सगळेच पक्ष सांगतात त्या नेत्यांचे विचार आठवणीत तरी असतील का? पूर्वीचे नेते देखील टीका करत. उखाळ्यापाखाळ्या काढत. पण ते करताना सभ्यतेची पातळी कोणी सोडली नाही.अनवधानाने असे घडले तर माफी मागण्यात कोणीही कमीपणा मानत नव्हते. राजकारणापलीकडची मैत्री सगळेच जपत. याचे दाखले विचारवंत अधूनमधून देतात. महाराष्ट्राला अशा व्यक्तिमत्वांची परंपरा लाभली आहे. पण त्यांनी घालून दिलेले नियम, संकेत आणि परंपरांना बट्टा लावण्याचे काम सर्रास सुरु आहे. त्यालाच रोखठोकपणा मानण्याचा भ्रम रुजला आहे. विचारांची लढाई विचारांनीच लढायची असते हा फक्त सुविचार उरला असावा. अनेक नेत्यांनी परस्परांवर केलेल्या वैयक्तिक टिप्पणी आठवल्या तरी संवेदनशील माणसाची मान शरमेने खाली जाईल. हे सगळे टाळावे असेही बहुधा कोणालाच वाटत नसावे, हे जास्त चिंताजनक आहे. वाचाळ लोकप्रतिनिधींना त्यांच्या घटनादत्त जबाबदारीचा विसर पडला आहे.जनता आणि सरकार यामधील दुवा म्हणून लोकप्रतिनिधी निवडून दिले जातात. त्यांचा मतदारसंघाचा चौफेर अभ्यास असावा, जनतेच्या समस्यांची, कायद्याची आणि नियमांची जाण असावी. समस्यांची कायदेशीर पद्धतीने तड लावण्याचे प्रयत्न त्यांनी करावेत अशी मतदारांची अपेक्षा असते. लोकांनाही त्याची आठवण येऊ नये म्हणूनच भावनिक मुद्दे उकरून काढले जात असतात का? सगळेच लोकप्रतिनिधी जनकल्याणाचे दावे करतात. नार्को चाचणी करायचीच झाली तर ती असे दावे करणाऱ्यांची केली जाऊ शकेल का? त्यामुळे दाव्यांमागचे पितळ तरी उघडे पडू शकेल. वर्षानुवर्षे कसे वेड्यात काढले जाते हे लोकांना तरी कळू शकेल.

## ब्रम्हनाथ येळंब व निमगाव मायंबा बंधाऱ्यांचे रुपांतरण कामास प्रशासकीय मान्यता-आ.धस

**शिरूर (कासार) । प्रतिनिधी**


**शिरूर (कासार) तालुक्यातील जलसंपदा विकासासाठीचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा पार पडला आहे. दीर्घकाळ प्रलंबित असलेले ब्रम्हनाथ येळंब व निमगाव मायंबा को. प. बंधाऱ्यांचे बॅरेज रुपांतरण काम अखेर आ. सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण व भगीरथ प्रयत्नांना यश येत महाराष्ट्र शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे.**

या मान्यतेनंतर तालुक्यातील जलसंपदा विकासाच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले गेले असून, शेतकऱ्यांसाठी ही ''जलसिंचनातील नवसंजीवनी''ठरणार आहे. ब्रम्हनाथ येळंब बंधाऱ्याच्या रुपांतरणासाठी ₹१७,३०,१२,६०६/- (सतरा कोटी तीस लाख बारा हजार सहाशे सहा रुपये) इतका निधी मंजूर झाला आहे, तर निमगाव मायंबा बंधाऱ्याच्या रुपांतरणासाठी ₹२२,०८,९५,१५६/- (बावीस कोटी आठ लाख पंच्याण्णव हजार एकशे छप्पन्न रुपये) एवढ्या खर्चाच्या प्रस्तावास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. या निर्णयानंतर लवकरच या दोन्ही ठिकाणी प्रत्यक्ष कामांना सुरूवात होणार आहे. प्रकल्पांतर्गत बंधाऱ्यांचे मजबुतीकरण, गेट्सची दुरुस्ती, नवीन बॅरेज बांधकाम, जलसाठा क्षमता वाढविणे आणि जलप्रवाह नियंत्रण यांसारखी महत्त्वाची कामे केली जाणार आहेत. परिणामी परिसरातील शेकडो हेक्टर शेतीला थेट सिंचनाचा लाभ मिळून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.या निर्णयामुळे शिरूर (कासार) परिसरातील जलसंपदा व्यवस्थापनात आमूलाग्र सुधारणा होईल. उन्हाळ्यातील पाण्याची टंचाई कमी होऊन पिकांचे उत्पादन वाढेल, भूजल पातळी स्थिर राहील, तसेच जनावरांसाठी पाण्याची उपलब्धता सुधारेल.स्थानिक शेतकरी, ग्रामपंचायत प्रतिनिधी आणि नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत करताना सांगितले की,हा निर्णय आमच्या शेतशिवाराच्या पुनरुत्थानाचा आणि जलसमृद्धीचा पाया ठरणार आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, तसेच भाजपा-महायुती सरकार आणि आ. सुरेश धस यांचे शेतकरी व ग्रामस्थांकडून मनःपूर्वक आभार मानण्यात आले आहेत. या प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीनंतर शिरूर (कासार) तालुक्याच्या कृषी विकासाला नवी दिशा आणि बळकटी मिळेल, असा विश्वास स्थानिक जनतेने व्यक्त केला आहे.

## बीडला उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांनी पदभार स्वीकारला

**बीड । प्रतिनिधी**

**बीडच्या उपविभागीय पोलीस अधिकारी या पदाचा कार्यभार पूजा पवार यांनी सोमवार दिनांक ६ ऑक्टेंबर २०२५ रोजी स्वीकारला. त्यांचे अधिकारी व कर्मचारी यांनी स्वागत केले.**



रशासनाने त्यांच्या नियुक्तीचे आदेश गुरुवार दिनांक १८ सप्टेंबर २०२५ शासनाने काढले होते. बीडचे उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वांभर गोल्डे हे दि. ३१ मे २०२५ रोजी सेवानिवृत्त झाल्यामुळे उपविभागीय पोलीस अधिकारी पद रिक्त होते. बीड उपविभागाचा अतिरिक्त कार्यभार आष्टी उपविभागीय पोलिस अधिकारी बाळकृष्ण हानपुडे पाटील यांच्याकडे कार्यभार देण्यात आला होता. पूजा पवार यांनी प्रशिक्षणार्थी कालावधीत उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांनी कर्तव्यदक्षपणे काम केल्याने त्यांची नियुक्ती बीड येथे करण्यात आली. बीड उपविभागात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात पूजा पवार यांची कारकिर्द यशस्वी राहील. पदभार स्वीकारताच त्यांचे अनेकांनी स्वागत केले. बीड जिल्ह्यात आपण काम केलेले असून जिल्ह्याची आपल्याला माहिती झालेली आहे. कायद्याने दिलेल्या अधिकाराचा निःपक्षपणे वापर करून आपल्या पदाला न्याय देण्याचा प्रयत्न करू आणि बीड जिल्ह्यातील नागरिकांच्या सेवेसाठी कायम तत्पर राहू,असे डीवायएसपी पूजा पवार यांनी म्हटले आहे.

## प्रलंबित दंड वसुलीसाठी जिल्हा पोलीस दलाचे अभियान; ९ लाख ५० हजाराचा दंड वसुल



**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील वाढती वाहतूक आणि अपघातांचे प्रमाण लक्षात घेता, जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांच्या संकल्पनेतून आणि अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, अप्पर पोलीस अधिक्षक अंबाजोगाईच्या चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात २८ पोलीस स्टेशन अंतर्गत ९ ठिकाणी प्रलंबित दंड वसुल अभियान राबविण्यात आले. यावेळी ११०० केसेसचा ९ लाख ५० हजार रुपयांचा एकूण दंड वसुल करण्यात आला.**

या अभियान हे पाडळसिंगी टोलनाका, पांगरबावडी पुल, केज टोल नाका, चुंबळी फाटा, धारुर टोलनाका, बर्दापूर टोलनाका, माजलगाव-परभणी टी पॉईंट, इटके कॉर्नर, परळी, अंभोरा चेक पोस्ट या ९ ठिकाणी मोहीम राबविण्यात आली. यामध्ये ८ पोलीस निरीक्षक, २३ सहाय्यक पोलीस निरीक्षक २५ पोलीस उपनिरीक्षक, ७८ वाहतुक अंमलदार इतर १७७ अंमलदार ३ आरसीपी प्लाटून यांनी सहभाग घेतला. एकाच दिवशी मोठ्या दंड वसुलीची करण्याची कारवाई केली.

पान ६ वरून...

### कर्जमाफीसह एकरी

भाई राहुल सोळंके,भाई अशोक कुलकर्णी,भाई आनंत चव्हाण, भाई भास्कर कांबळे,प्रा. बालासाहेब येवले, भाई सलीम खा पठाण,भाई श्रीराम शेवाळे,जनार्धन कुदळे,सोनाजी जाधव,गोरख आढाव,ज्ञानोबा आगरकर,सतीश शेजुळ,चांगदेव शेजुळ आदींनी उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय माजलगाव यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली असून वरील मागण्या तात्काळ मान्य न केल्यास दि १० ऑक्टोबर रोजी सकाळी १०:०० वाजता पात्रुड येथील लोणगाव फाट्यावर तसेच दिनांक ११ ऑक्टोबर रोजी सकाळी १०:०० वाजता मोठेवाडी फाटा छोटीवाडी येथे शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

--------------

### चिंचवण येथे मंगळवारी

देवीची दोन दिवसीय यात्रेचे याठिकाणी आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये देवीचा पालखी सोहळा दि.७ ऑक्टोबर २०२५ आश्विन शुध्द पोर्णिमा, मंगळवार रोजी रात्री ८ वाजता श्री.जगदंबा देवीचा छबिना पालखी मिरवणूक उत्साहात निघणार आहे. या मिरवणुकीसाठी गावातीलच नव्हे तर पंचक्रोशीतील असंख्य भाविक मोठ्या श्रध्देने उपस्थित राहतात. तसेच या यात्रेचे मुख्य आकर्षण असलेली पारंपारिक कुस्ती दंगल दि.८ ऑक्टोबर २०२५ बुधवार रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत रंगणार आहे. परिसरातील नामवंत व बलाढ्य मल्ल मैदानात उतरणार असून कुस्तीप्रेमींसाठी हा थरारक सोहळा ठरणार आहे. यासाठी सुरुवातीचे बक्षीस हे १० रुपयांपासून ते अंतिम बक्षीस ५ हजार रुपयांपर्यंत असणार आहे. तरी यात्रा कमिटी चिंचवण व समस्त गांवकरी यांनी पंचक्रोशीतील भाविकांना या पालखी सोहळा, भजन, दंडपट्टा आणि जंगी कुस्त्यांचा आनंद घेवून यात्रेची शोभा वाढवावी असे आवाहन केले आहे. ही यात्रा केवळ धार्मिकच नव्हे तर सांस्कृतीक परंपरेचेही प्रतिक ठरणार असून, चिंचवण नगरी पुन्हा एकदा भक्तिभाव व उत्साहाने उजळून निघणार आहे.

--------------

### शेतकऱ्यांच्या खरडून गेलेल्या

झाली आहे. अशा परिस्थितीत महसूल विभागाचे अधिकारी आमच्या बागायती जमिनीची नोंद सातबारावर असताना सुद्धा कोरडवाहू जमिनीचे पंचनामे सरसकट करत आहेत. बागायती असूनही आम्हाला त्याचे बागायती नुकसान आर्थिक मदत मिळत नाही. अशा विविध मागण्या दगडगाव, औरंगपूर कुकडा येथे धरणे आंदोलनास बसलेल्या शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह शेतकऱ्यांनी केली आहे. माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी तात्काळ दि ३ ऑक्टोबर रोजी सर्व आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांची प्रत्यक्ष जाऊन भेट घेतली. त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या. त्यांच्या समवेत माजी उपसभापती भीष्माचार्य दाभाडे उपस्थित होते. त्यानंतर माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी, गेवराई मतदार संघासह बीड जिल्ह्यात अतिवृष्टी आणि गोदावरी व सिंदफणा नदीला पाणी सोडल्याने आलेल्या पूर परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे सर्व उभे पिके वाहून गेली असून त्यांच्या जमिनी खरडून वाहून गेलेल्या आहेत. पिकाची नुकसान भरपाई मिळेल त्यानंतर पुन्हा पेरणीही केली जाईल परंतु संपूर्ण जमिनीवरची मातीच वाहून गेली असेल तर त्या शेतकऱ्याने पेरणी करायची कुठे? असा प्रश्न उपस्थित करून खरडून जमिनी वाहून गेलेल्या शेतकऱ्यांना इतर ठिकाणाहून गाळ किंवा काळी माती शेतामध्ये टाकून पुनर्भरण करण्यासाठी शासनाने आर्थिक मदत करावी आणि पुन्हा त्यांच्या पिकासाठी जमीन उपलब्ध करून द्यावी अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कृषी मंत्री दत्ता मामा बारणे यांना निवेदनाद्वारे केली आहे.

--------------

### बीड, शिरूर कासार

पाटील उपस्थित होते.या मान्यवरांच्या हस्ते हिंगणी खुर्द, जेबा पिंपरी, कपिलधारवाडी, आर्वी, मार्करवाडी, शिरापूर गात, फुलसांगवी, गाजीपूर, हाजीपूर, तरडगव्हाण, हिवरसिंगा जांब, ढोकवड, कमलेश्वर धानोरा, साक्षाळ पिंपरी, उमरद जहागीर, बहादरपूर आणि कपिलधारवाडी या गावांमध्ये किराणा किटचे वितरण करण्यात आले. यावेळी गावचे सरपंच, पदाधिकारी, कार्यकर्ते, पूरग्रस्त नागरिक उपस्थित होते.

--------------

### शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी

जिल्ह्यातील ११० कर्मचारी कर्मचाऱ्यांवर तसेच महाराष्ट्रातील २२०० शिक्षक कर्मचारीवर बेरोजगारीची कुऱ्हाड केंद्र शासनाच्या या निर्णयामुळे कोसळली आहे. २००४ पासून महाराष्ट्रातील या प्रकल्पात काम दिलेल्या सेवेचा मोबदला म्हणून २०१६ पासून राज्य शासन तथा केंद्र शासन यांच्याकडे शासकीय सेवेत समायोजन करण्यासाठी साधी वेळोवेळी पाठपुरावा आम्ही करत आहोत . करिता राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी व यावर तत्काळ निर्णय घेऊन कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत समयोजन करण्यात यावे अशी मागणी यावेळी करण्यात आली . तसेच यामध्ये वयाची पन्नाशी ओलांडली अश्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या एकत्रित सानुग्रह अनुदान देऊन पुनर्वसन करण्यात यावे.यासाठी बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पपातील शिक्षक, लिपीक, शिपाई कर्मचारी उपस्थित होते.यावेळी माजी प्रकल्प संचालक ओमप्रकाश गिरी सर यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना शब्द दिला की भाजपा कामगार मोर्चा बीड च्या वतीने एकदिवसीय लाक्षणिक आंदोलन साठी पाठिंबा देतो .व भाजपा कामगार मोर्चा च्या माध्यमातून शासन स्तरावर शिक्षण विभाग, कामगार विभाग कडे पाठपुरावा करून आपला प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करतो.तसेच यावेळी क्षेत्रीय अधिकारी शेख अफसर सर यांचे पण मोलाचे मार्गदर्शन केले.राज्य सचिव शंकर झाडे हे आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पातील शिक्षक कर्मचारी यांनी आजपर्यंत संविधानीक पद्धतीने शांततेत च्या मार्गाने आंदोलन, निवेदन देऊन मागणी शासनाकडे केली पण शासनाने आमच्या कडे पुर्ण दुर्लक्ष केले आमचा शासनाने आंत पाहु नाही.लवकर निर्णय न घेतल्यास यापलीकडे जाऊन तिर्व आंदोलन करण्यात येईल असे म्हटले.तसेच राहुल घनगाव जिल्हा अध्यक्ष, मैंद शहाजी सर , विष्णू काळे सर , कांबळे रंजनी मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी सर्व शिक्षक कर्मचारी यांनी घोषणा देऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर परिसर दुमदुमून सोडला होता.एकदिवशीय लाक्षणिक लक्षवेधी आंदोलन करण्यासाठी संजय सांबळे सर, सचिन दिवटे, व्यंकटी काळे सर , प्रकाश काळे सर, अरुण टकले,रमेश सलगर सर, दत्तात्रय टाकणकर सर, योगेश गायकवाड,समीर शेख ,पिसाळ दिनेश,आंवतकर जयराम, घडवे रमेश, शेळके हरिभाऊ, जोगदंड विठ्ठल,दिक्षीत वर्षा,लबडे वर्षा, म्हेत्रे ज्योती, ढोले मंजूषा,आगळावे राधा, खोडके मंजूषा, आचार्य गायत्री, विद्या तुरकमारे,जगतकर सुवर्णा,संगीता कुलकर्णी, काटे मनिषा,सपकाळ इंदू,कुसळे कल्पना, खैरे सुरेखा,इत्यादी शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.

--------------

### स्वखर्चाने विकासकामे,

कैलास ठोंबरे यांच्या निदर्शनास हि बाब काही ग्रामस्थांनी घालून हा रस्ता मोकळा करण्याची गरज असल्याचे सांगितले.ग्रांमपंचायतच्या ढिसाळ कारभारामुळे हा प्रश्न मार्गी लागत नसल्याने ठोंबरे यांनी स्वखर्चाने जेसीबीच्या साह्याने हा रस्ता दुरुस्त करत चारकाकी वाहन जाण्याईतपत रस्ता मोकळा केला.यामुळे येथून रहदारी करण्यासाठी गावकऱ्यांना शक्य होत असल्याने समाधान व्यक्त होत आहे.गावातील अनेक रस्त्यांवर पावसाळ्यात पाणी साचून झालेली बिकट परिस्थितीवर मुरुम टाकत रस्ते दुरुस्त करून माझे गाव सुंदर गाव हा संकल्प कैलास ठोंबरे जोपासत असल्याने गावातील ग्रामस्थ समाधान व्यक्त करीत आहेत.

--------------

### देवगाव येथील शिक्षकांना

मोठे झालो . त्या परि आपलेही काही कर्तव्य आहेत त्या कर्तव्याशी पाठ न फिरवता. आपणही त्या समाजाचे काहीतरी देणे लागतो आणि म्हणून जेव्हा जेव्हा आपल्याला आपले कर्तव्य पार पाडायची संधी भेटते तेव्हा तेव्हा नक्कीच ती संधी घ्या आणि त्या समाजाप्रती आपली कर्तव्य पार पाडा. आणि समाजात काहीतरी नवीन पेरण्याचा प्रयत्न करा सध्या शिक्षकांच्या बदलीमुळे अनेक शाळांमध्ये हृदय पिळवटून टाकणारे क्षण घडत आहेत. लाडक्या गुरूजींच्या प्रेमापोटी निरागस चिमुकले अश्रूंनी रडताना दिसत आहेत. शिक्षण देणारा देव माणूस जेव्हा शाळा सोडून जातो, तेव्हा मुलांच्या हृदयात पोकळी निर्माण होते. हाच तर खरी शिक्षक विद्यार्थी नातीची गोडी आणि पवित्रता आहे.हे चित्र फक्तं आणि फक्तं जिल्हा परिषद शाळांत दिसून येते

--------------

### जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे

चळवळीची माहिती व्हावी या उद्देशाने महाराष्ट्र राज्यात प्रत्येक जिल्ह्यामध्ये वरिष्ठ महाविद्यालयातील युवक युवती करता सहकार बोर्डाच्या वतीने जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रथम आलेल्या युवक युवती ना महाराष्ट्र राज्य सहकारी संघामार्फत माहे नोव्हेंबर २०२५ मध्ये आयोजित करावयाच्या राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धेत थेट प्रवेश दिला जाईल याची सर्व स्पर्धकांनी नोंद घ्यावी या स्पर्धेसाठी खालील विषय देण्यात आलेले आहेत त्यामध्ये १) सहकारी चळवळीतून ग्रामीण विकास २) सहकारातून रोजगार निर्मिती ३) सहकारी चळवळीत युवक युवतीचा सहभाग ४) सहकार व खाजगी क्षेत्र ५) सहकारातून नवभारताची निर्मिती ६) सहकारातून समृद्धी. हे सहा विषय यामध्ये दिलेले आहेत या स्पर्धेचे नियम स्पर्धेत सहभागी होण्याकरिता प्रत्येक स्पर्धकाकडून १०० रुपये प्रवेश फी आकारण्यात येईल स्पर्धेत सहभागी स्पर्धकातून प्रथम व द्वितीय क्रमांक काढला जाईल सहभागी प्रत्येक स्पर्धकाला ७+३=१० मिनिटे असा वेळ देण्यात येईल या स्पर्धेसाठी तज्ञ अभ्यासक यांची परीक्षक म्हणून निवड करण्यात येईल वरील अटीस अधीन राहून आपल्या जिल्ह्यातील जिल्हा उपनिबंधक व जिल्हा सहकार बोर्ड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयास आमंत्रित करून जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

--------------

पान १ वरून...

### ऐन दिवाळीत परतीचा पाऊस

आणि सौराष्ट्र प्रदेशात मुसळधार पाऊस पडला. मुंबईच्या दक्षिणेकडील भागांना याची सर्वाधिक फटका बसला. मात्र, पाऊस कधी जाणार? असा प्रश्न निर्माण झाला आहे.हवामन खात्याच्या अंदाजानुसार मुंबई आणि आसपासच्या भागात २ ऑक्टोबरपर्यंत पाऊस बरसणार नाही. मात्र, त्यानंतर परतीचा पाऊस पुन्हा बरसू शकतो. खरंतर २९ सप्टेंबर रोजी पाऊस थांबण्याची अपेक्षा होती. मात्र, अजूनही काही भागात तुरळक पाऊस बरसत आहे. २०२० साली पाऊस ८ ऑक्टोबरपर्यंत बरसत होता. तर, २०२४ साली पाऊस १५ ऑक्टोबरपर्यंत बरसत होता. या वर्षीही हीच परिस्थिती राहण्याची शक्यता आहे. मराठवाडा सोलापूर कडील काही भागात पावसाने हाहाकार माजवला शेतकऱ्याचे शेतातील पिकाची माती झाली सोयाबीनचा चिखल तर कापसाच्या वातीझाल्याने शेतकरी मेटाकुटीस आला आहे त्यातच पूरपरिस्थिती निर्माण झाल्याने बीड जिल्ह्यातील गोदावरी पट्ट्यात अनेक गावांना स्थलांतरित करावे लागले होतेआता पुन्हा परतीच्या पावसाचा अंदाज वर्तवला जात आहे आणि तोही दिवाळीतच बरसणार कि काय असा प्रश्न निर्माण झाला आहे.

--------------

### राज्यातील नगरपालिका

हदगाव ,पन्हाळा ,धर्माबाद, उमरखेड, मानवत,पाचोरा,पेण,फैजपूर, उदगीर ,अलिबाग, .३४ नगरपरिषदा ओबीसी महिलासाठी आरक्षित त्यामध्ये भगूर , इगतपुरी, विटा , बल्हारपूर, धाराशिव , भोकरदन, जुन्नर, उमरेड, दौड, कुळगाव बदलापूर, हिंगोली, फुलगाव, मुरुड जजीरा, शिरूर, काटोल, माजलगाव, मूल, मालवण, देसाईगंज, हिवरखेड, अकोट, मोर्शी, नेर- नवाबपूर, औसा, कर्जत, देगलूर, चोपडा, सटाणा, दोंडाईचा वरवडे, बाळापूर, रोहा, कुरडुवादी, धामणगावरेल्वे, वरोरा. १६ नगरपरिषदासाठी अनुसूचित जाती महिला आरक्षण जाहीरदेऊळगावराजा,मोहोळ, तेल्हारा, ओझर, वानाडोंगरी, भुसावळ, घुग्गूस, चिमूर, शिर्डी, सावदा, मैनदर्गी, दिगडोहदेवी, दिग्रस, अकलूज , बीड , शिरोळ, ओबीसीसाठी राखीव- पारनेर, तळा, घनसावंगी, भामरागड, माळशिरस, आष्टी बीड,एटापल्ली, झरीजामणी, मंचर, पाटोदा, खानापूर, माढा, पोंभुर्णा, माहूर, वडवणी, पोलादपूर, आटपाडी, खालापूर, मालेगाव जहांगीर, शिरूर अनंतपाळ,पालम ,कळवण, मंठा, सावली, कोंढाळी, जाफराबाद, चाकूर, तीर्थपुरी, कणकवली, शिरूर कासार, आष्टी वर्धा,विक्रमगड,अकोले,जिवती, मोखाडा,कर्जत अहिल्यानगर आणि सुरगाना.

**मागास प्रवर्गाकरिता (ओबीसी)जागा जाहीर**

पारनेर,तळा ,घनसावंगी ,भामरागड , मंचर , पाटोदा ,खानापूर ,माढा,पोभुर्णा, माहूर,वाडवणी ,पोलादपूर ,आटपाडी ,खालापूर,मालेगाव जहांगीर,शिरूर अनंतपाळ ,पालम ,कळवण मंठा,सावली,कोंढाळी ,मानोरा ,मारेगाव, माळशिरस, आष्टी(वर्धा), एटापल्ली, झरी- जामणी,तलासरी ,जाफ्राबाद,चाकूर, तीर्थपुरी, कणकवली, शिरूर कासार, आष्टी(बीड), विक्रमगड, अकोले, जिवती, मोखाडा,कर्जत , अहिल्यानगर, सुकाना ओबीसी राखीव महिला नगरपंचायत पोलादपूर ,तलासरी,आष्टी बीड,वडवणी कळवण,घनसावंगी ,सावली ,कर्जत- अहिल्यानगर ,माळेगाव ,पाटोदा ,खालापूर,मंचर ,भामरागड ,शिरूर अनंतपाळ , माढा ,आष्टी वर्धा ,जाफराबाद ,चाकूर ,मानोरा , जीवनी

**खुल्या प्रवर्गासाठी महिला नगरपंचायत**

मोहडी ,बार्शी टाकळी,वाशी- ,म्हाळुंगा श्रीपूर ,नांदगाव खंडेश्वर ,गुहागर ,राळेगाव,लाखांदूर ,वैराग- खुला महिला ,सोयगाव,महादूला ,अनगर , कडेगाव ,पेठ- पाठण,औंढा नागनाथ-,लाखनी, रेणापूर, नातेपुते, म्हसळा , सडक अर्जुनी, दिंडोरी,जळकोट,मेढा , लोणंद,वाडा,देवरुख, लांजा,सिंदखेडा, मंडणगड, तिवसा, वडगाव मावळ, पारशिवनी, शहापूर , देहू, कुही,मुक्ताईनगर, बाभुळगाव

-----------

### शरद पवारांनी मराठ्यांचं

भाजपच्या नेत्यांनी केला होता. त्यावेळी जरांगे यांनी शरद पवारांवर टीका केली नव्हती. पण आता शरद पवारांनीच मराठ्यांचं वाटोळं केल्याचा आरोप मनोज जरांगे यांनी केला.मंत्री छगन भुजबळ आणि मनोज जरांगेंमध्ये पुन्हा एकदा वाद पेटल्याचं दिसून येतंय. छगन भुजबळांवर गंभीर आरोप करत जरांगेंनी एक मोठा दावा केला. छगन भुजबळ आणि विजय वडेट्टीवार यांच्यात एक गुप्त बैठक झाली, या बैठकीत ओबीसी आंदोलनाचं नेतृत्व काँग्रेसकडे घ्यावं, असं भुजबळ वडेट्टीवारांना म्हणाल्याचा दावा जरांगेंनी केला.

----------

### बीडच्या जेलमध्ये धर्मांतरणासाठी लाखो

लाखो रुपये देतो अशा प्रकारची भूमिका तुरुंग अधिकारी घेत आहेत. बीडमध्ये सुरू असलेल्या या सर्व प्रकाराची माहिती मुख्यमंत्र्यांना दिली असून त्याची चौकशी करावी आणि तुरुंग अधिकाऱ्याला बडतर्फ करावं अशी मागणी केली आहे. तुरुंग अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करावा आणि सीसीटीव्हीच्या आधारे तपास करावा अशी मागणी केल्याची माहिती आमदार गोपीचंद पडळकरांनी दिली.

--------------

### बिहारच्या निवडणुका

रोजी अधिसूचना जारी करण्यात येणार आहे.बिहार निवडणुकीसाठी अर्ज करण्याची तारीख ही १७ ऑक्टोबर (पहिला टप्पा) आणि २० ऑक्टोबर (दुसरा टप्पा) असेल.अर्जांची छाननी ही १८ ऑक्टोबर (पहिला टप्पा) आणि २१ ऑक्टोबर (दुसरा टप्पा) रोजी होणार.अर्ज मागे घेण्याची मुदत ही २० ऑक्टोबर (पहिला टप्पा) आणि २३ ऑक्टोबर (दुसरा टप्पा) असेल. बिहारमध्ये आम्ही सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांशी चर्चा केली. त्याचसोबत सर्व निवडणूक आयोग, जिल्हाधिकारी आणि इतर सर्व अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचं निवडणूक आयोगाने म्हटलं आहे.निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार म्हणाले की, ''यावेळी बिहारच्या निवडणुका सुरळीत आणि सोप्या पद्धतीने होतील. निवडणुकीसाठी आम्ही बिहारच्या जनतेचे सहकार्य अपेक्षित करतो. बिहारमध्ये एकूण ७ कोटी ४२ लाख मतदार आहेत. त्यापैकी ३ कोटी ९२ लाख पुरुष आणि ३ कोटी ५० लाख महिला मतदार आहेत. १४ लाख मतदार पहिल्यांदाच मतदान करतील. प्रत्येक मतदान केंद्रावर १,२०० मतदार असतील. निवडणुकीच्या काळातील फेक न्यूजवर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा ज्ञानेश कुमार यांनी दिला. सर्व मतदान केंद्रांवर हिंसाचारावर शून्य सहनशीलतेचे निर्देश देण्यात आले आहेत. सर्व अधिकारी निष्पक्षपणे काम करतील.

-------------

### ओबीसी आरक्षण लढा

तर मनोज जरांगे यांच्या हातात एके-४७ द्या आणि ओबीसी समाजाचा खात्मा करायला सांगा. अशी संतप्त प्रतिक्रिया दिल्या नंतर काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी पुन्हा एकदा, मनोज जरांगे यांना फाशी देण्याची भाषा केली आहे. मनोज जरांगे यांना गरीब मुलांसाठी आरक्षण हवे, त्यात नोकरी मिळत आहे. मात्र जरांगे यांना राजकीय आरक्षण हवे म्हणून त्यांना ओबीसीतूनच आरक्षण हवे आहे. असेही विजय वडेट्टीवार म्हणाले.शासनाचा जीआर महाराष्ट्रातील ३७४ जातींवर अन्याय करणारा आहे, हे स्पष्ट मत आहे. त्यामुळे आम्ही १० ऑक्टोबरला मोर्चा काढणार आहोत. या जीआर मध्यला पात्र शब्द सुद्धा वगळावा. पहिल्यांदा मात्र हा शब्द नव्हता, नंतरच्या एक तासात जीआरमध्ये पात्र शब्द टाकला आहे आणि ऑनलाईन सिग्नेचर घेतलेला आहे. हा सगळा निर्णय दबावात झालेला आहे, एखादा प्रस्थापित समाज ज्याच्याकडे सगळे काही आहे. सत्ता आहे, संपत्ती आहे, ऐश्वर्या आहे, यात जर काही गरीब लोक असलेले त्याच्यासाठी ईडब्ल्यूएसची व्यवस्था आहे. त्यांना ओबीसीमधूनच आरक्षण द्या, अशी मागणी चुकी आहे. असेही विजय वडेट्टीवार म्हणाले.

---------------

### सरन्यायाधीशांवर बूट

अशी घोषणा देत होता. काही प्रत्यक्षदर्शींनी वेबसाइटला सांगितले की, संबंधित व्यक्तीने सरन्यायाधीशांवर 'बूट' फेकण्याचा प्रयत्न केला, तर काहींनी सांगितले की ,सरन्यायाधीशांवर कागदाचा गुंडाळा फेकण्यात आला. असाही दावा करण्यात आला की तो माणूस वकिलाच्या पोशाखात होता.

---------------

### एन दिवाळीत आनंदाचा शिधा'

देण्यात आलेला नाही. त्यामुळे 'शिवभोजन थाळी' ही योजना जवळपास बंद पडल्याची चर्चा सुरू असतानाच आता 'आनंदाचा शिधा' ही लोकप्रिय योजना देखील कागदावरच असल्याचे दिसून येत आहे.आनंदाचा शिधा योजनेची घोषणा सर्वप्रथम २०२२ मध्ये दिवाळीच्या तोंडावर करण्यात आली होती. त्यानुसार केशरी रेशन कार्ड असलेल्या कुटुंबांना १०० रुपये या सवलतीच्या दरात चार पदार्थ देण्यात आले होते. या किटमध्ये प्रत्येकी एक किलो रवा, चणाडाळ आणि साखर, तसेच एक लिटर सोयाबीन तेल समाविष्ट होते. २०२३ मध्ये गुढी पाडवा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आणि नंतर गणेशोत्सव तसेच दिवाळीच्या निमित्ताने अशाच प्रकारचे किट वाटण्यात आले होते. २०२४ मध्ये अयोध्येतील श्री राम मंदिराच्या उद्घाटनानिमित्त तसेच गणेशोत्सवादरम्यान देखील हे किट वाटण्यात आले होते.प्रत्येक वेळी, योजनेचा खर्च ५०० कोटी रुपये होता आणि सरासरी १.६ कोटी लाभार्थी होते. परंतु गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणि शेतक-यांना मोफत वीज यासह विविध योजना सरकारने जाहीर केल्या होत्या. त्यामुळे राज्याच्या तिजोरीवर एक लाख कोटी रुपयांपेक्षा अधिकचा भार आला आहे. महसूलात येणारी तूट भरून काढून राज्याच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी आगामी अर्थसंकल्पात कठोर निर्णय घेण्यात येतील, असे संकेत अर्थमंत्री अजित पवार यांनी दिले होते. त्यामुळे निवडणुकीनंतर सत्तेवर येताच आर्थिक चणचणींमुळे अनेक लोकप्रिय योजनांना कात्री लागण्यास सुरुवात झाली आहे. यंदा दिवाळीत सर्वसामान्यांना आनंदाचा शिधा देण्यात येणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

-------------

cmyk

cmyk


# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. ०७ ऑक्टोबर २०२५ | ३


## थोडक्यात...



### तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेत जयभवानीने पटकावला प्रथम क्रमांक

पाटोदा । प्रतिनिधी

तालुकास्तरीय शालेय कबड्डी क्रीडा स्पर्धा १७ वर्षे वयोगटात जय भवानी माध्यमिक विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय ह्या मुलींचा संघ प्रथम क्रमांक पटकावला अंतिम सामना हा दबा घुमरे विद्यालय गेवराई विरुद्ध जय भवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शिवाजी नगर गडी या दोन संघात झाला. विजय संघाचे अभिनंदन माजी मंत्री शिवाजीराव दादा पंडित साहेब. अमरसिंह जी पंडित साहेब जयसिंह पंडित साहेब आमदार विजयराजे पंडित शारदा स्पोर्ट्स अकॅडमी चे अध्यक्ष रणवीर राजे पंडित व पृथ्वीराज पंडित तसेच जय भवानी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य राठोड सर व उपप्राचार्य बडवे सर आणि पर्यवेक्षक बडे सर ज्येष्ठ क्रीडा शिक्षक गिरी सर अपशिंगे सर डोंगरे सर पांढरे सर आडे सर तसेच सर्व शिक्षकवंद यांनी खेळाडूचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा.

### सिताबाई क्षीरसागर यांचे निधन

म्हसोबावाडी । प्रतिनिधी



आष्टी तालुक्यातील मौजे दाणी पिंपळगाव व रहिवासी कडा येथे असणारे बाबुराव क्षीरसागर यांच्या पत्नी सिताबाई बाबुराव क्षीरसागर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले त्यांच्या पाश्चात्य त्यांचे पती बाबुराव त्यांची सुन व पाच नातवंडे आहेत त्या पत्रकार प्रेम पवळ व प्रिया पवळ यांच्या आई आजी होत्या.


### प्रमोद जोशी यांना पितृशोक

बीड । प्रतिनिधी

जटाशंकर गल्ली मधील प्रविण अण्णा जोशी आणि एबीपी माझाचे कॅमेरामन तथा चॅनल प्रतिनिधी प्रमोद पिंटु जोशी यांचे वडील प्रभाकरराव (पोपट काका) जोशी यांचे दुःखद निधन अंत्यविधी आज सकाळी ८.०० वाजता राहत्या घरापासुन अमरधाम स्मशानभुमी मोंढा रोड येथे होईल.

### माजलगावात बालाजी मंदिर येथे त्रिदिवशीय ब्रम्होत्सव आनंदात साजरा

माजलगाव । प्रतिनिधी



शहरातील बालाजी मंदिर येथे ब्रम्होत्सवा निमित्ताने गोविंदा गोविंदा नामाच्या गजरात शनिवारी भव्य दिव्य शोभायात्रा काढण्यात आली व त्रिदिवशी श्री.सहस्त्र कलशाभिषेक विधी व हवन विधी आयोजित केला होता या हवन विधी चे यजमान उज्वल शिवप्रसाद भुतडा हे होते तर रविवारी व सोमवारी रोजी विधी वत पुजन करून १००० महिला भक्तांनी विष्णु सहस्त्रनाम व व्यंकटेश स्तोत्र चे वाचन केले. कोजागिरी पौर्णिमा श्री बालाजी भगवानास सहस्त्र कलशाभिषेक त्रिशोपचार महापूजन, ध्वजारोहण, नैवेद्य महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या महाप्रसादाचा हजारो भाविक भक्तांनी लाभ घेतला. या महाप्रसादाचे यजमान राम स्वरुप खंडेलवाल व कारभारी काळे हे होते. या तीन दिवस अतिशय आनंदाचे वातावरणात सर्व कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडले. श्री बालाजी मंदिर फाउंडेशनच्या वतीने या ब्रम्होत्सव कार्यक्रम माजलगावातील सर्व भाविक भक्तांनी भरभरून प्रतिसाद दिल्याबद्दल धन्यवाद व आभार व्यक्त केले.

### शिरूर पोलीसांची अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई

शिरूर का. । प्रतिनिधी

येथील तरडगव्हण पुलाजवळ सापळा रचून अवैधरित्या वाळूची चोरी करून वाहातूक करत असताना सचिन रामेश्वर जगदाळे, गोविंद सुभाष पवार या दोघांना पकडण्यात आले. त्यांच्याकडे असलेले वाळूने भरलेले ट्रॅक्टर असा एकूण ८ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलीस निरीक्षक प्रविण जाधव, पोलीस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी, बिट अंमलदार तुषार गायकवाड, सुनिल बहिरवाल यांनी केली. अवैध वाहातुकी विरोधात जिल्हा पोलीसांकडून कठोर पावले उचलली जात आहेत. तेव्हा असे आढळून आल्यास पुढेही कारवाया करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# आणखी पंचनामेच नाहीत तर मदत मिळणार कधी?

## दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाईची मागणी

**पाटोदा । प्रतिनीधी**

**जवळ जवळ पंधरा दिवस झाले अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या जमिनी खरडुन वाहुन गेलेल्या असुन अनेकांच्या विहिरी बुजल्या असुन काहींच्या वाहुन गेलेल्या तसेच इतर झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई म्हणून मदतीसाठी अनेक शेतकऱ्यांनी तहसिलदार यांना फोटोसह अर्ज दाखल केलेले असताना पंधरा दिवस होत आले तरी साधे पंचनामे सुध्दा हे ढेपाळलेले तहसिल प्रशासन करु शकले नाही. अशा भयान आपत्तीच्या काळात जर काही कामचुकार अधिकारी व कर्मचारी कामात दिरंगाई करत असतील करून सदर कामी दुर्लक्ष अथवा टाळाटाळ केल्यास नैसर्गिक आपत्ती कायदा २००५ मधील कलम ५१ व ५६ नुसार अशा बेजबाबदार अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत असुन पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अशा भयान आपत्तीच्या काळात आजारी असल्याच्या कारणास्तव या यंत्रणेत कुठेही दिसत नसुन त्यांची यंत्रणाही गायब असल्याचे दिसते.**



पाटोदा तालुक्यात दिनांक २१ आणि २२ सप्टेंबर रोजी झालेल्या ढगफुटी व अतिवृष्टीमुळे मांजरा नदीकाठच्या परिसराला प्रचंड फटका बसला.शेतकऱ्यांची शेती खरडून गेली, अनेक घरांत पाणी शिरून मोठे नुकसान झाले.या घटनेला तब्बल जवळ जवळ १३,१४ दिवस उलटल्यानंतरही अनेकांचे पंचनामे झालेले नाहीत,विशेषतः खरडून गेलेल्या जमिनींचे पंचनामे व विहिरीचे पंचनामे न झाल्याने शेतकऱ्यांत संताप उसळला आहे. ग्रामसेवक,तलाठी आणि कृषी सेवकांकडून टोलवाटोलवी होत असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर होत आहेत.

पाटोदा तालुक्यात झालेल्या ढगफुटीनंतर व अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करून दुसऱ्याच दिवशी आमदार सुरेश धस यांनी पाटोदा तहसील कार्यालयात तालुक्यातील सर्व शासकीय यंत्रणेची अधिकारी व कर्मचारी यांची बैठक घेतली होती.त्या बैठकीत आ.सुरेश धस यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरून कठोर सूचना दिल्या होत्या.पहिल्या दोन दिवसांत थोडी चपळाई दिसली,पण नंतर पुन्हा कर्मचाऱ्यांकडून टाळाटाळ सुरू झाली. आता तहसिलदार दत्तात्रय निलावाड यांनी दिनांक ३/१०/२०२५ रोजी बैठक घेऊन पंचनामे करण्याच्या सक्त सुचना दिलेल्या आहेत.तहसीलदारांच्या आदेशानंतर खरोखरच पंचनाम्याच्या कामाला गती मिळते का,याकडे शेतकऱ्यांसह सर्वांचे लक्ष लागले आहे.

### शिवणीत आश्विन पौर्णिमेनिमित्त धम्मउत्सव

#### भिक्खु धम्मशील थेरोंचे उपस्थित राहण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.आनंद कौसल्यायन नगर येथे, आश्विन पौर्णिमा व वर्षावास समापन निमित्ताने मंगळवार (ता.७) रोजी दुपारी १२ वाजता धम्मदेसना व भोजनदान तसेच सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. बौद्ध उपासक-उपासिका यांनी उपस्थित रहावे असे आवाहन प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था सचिव भिक्खु धम्मशील थेरो यांनी केले आहे.



बीड शहरात बौद्ध धम्म प्रचाराच्या निमित्ताने विहारात वर्षाकाळात वर्षावास करुन, धम्मप्रचाराचे काम जलदगतीने होत आहे. त्यांच्या १३ व्या वर्षावास समारोपाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी सकाळी १० वाजता ऐतिहासिक बोधी वृक्षाची पूजा, भोजनदान, दुपारी १२ वाजता बुद्ध वंदना, त्यानंतर धम्मदेसना, सत्कार व मार्गदर्शन होणार आहे. यावेळी भन्ते बुद्धबोधी यांची धम्मदेसना होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून फुले आंबेडकरी चळवळीतील कृतीशील कार्यकर्ते अनिल डोंगरे, प्रा.डॉ.विक्रम धन्वे उपस्थित राहणार आहेत. तसेच संपादक नितीन मूजमुले यांनी बौद्ध धम्म स्वीकारण्याची घोषणा केल्याबद्दल त्यांचा विशेषतः सत्कार समारंभ होणार आहे. दरम्यान बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांच्याकडून भोजनदान दिले जाणार आहे. तसेच अखिल भारतीय सहावी बौद्ध धम्म परिषद यशस्वी करणाऱ्या उपासक- उपासिका यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात बौद्ध उपासक-उपासिका यांनी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करुन उपस्थित रहावे असे आवाहन प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था सचिव भिक्खु धम्मशील थेरो यांनी केले आहे.

### योगेश्वरी पॉलिटेक्निकमध्ये विद्यार्थ्यांसाठी उभारले 'टू व्हीलर सर्विस स्टेशन'

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

तंत्रशिक्षणात महाराष्ट्रात अग्रेसर असणाऱ्या योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक मध्ये ऑटोमोबाईल व मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांचा प्रत्यक्ष अनुभव यावा या हेतूने दिनांक ३ ऑक्टोबर २०२५ रोजी पू. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या जयंतीनिमित्त टू व्हीलर सर्विस स्टेशनची उभारणी करण्यात आली आहे. या सर्विस स्टेशनचा उद्घाटन समारंभ संस्थेचे उपाध्यक्ष श्री.गणपत व्यास यांच्या शुभहस्ते करण्यात आला. या सर्विस स्टेशनधून विद्यार्थ्यांना कौशल्य विकास,प्रत्यक्ष अनुभव, नवीन तंत्रज्ञानाची माहिती, पुढील करिअरची संधी, सुरक्षितता व देखभालीचे महत्व याबाबत माहिती मिळणार आहे.

विद्यार्थ्यांसाठी टू-व्हीलर सर्व्हिस स्टेशन म्हणजे केवळ दुरुस्तीची जागा नसून ती एक व्यावसायिक संधी आहे. हे स्टेशन विद्यार्थ्यांना मेकॅनिकचे कौशल्य शिकण्याची, वाहनांची तपासणी आणि दुरुस्तीची प्रात्यक्षिके पाहण्याची, आणि या क्षेत्रात करिअर




घडवण्याची संधी देते. हे सर्विस स्टेशन विद्यार्थ्यांना वाहनांच्या देखभालीचे महत्त्व समजून घेण्यास आणि व्यावसायिक शिक्षण घेण्यास मदत करेल असे मत उद्घाटन प्रसंगी मा. अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी व्यक्त केले. याप्रसंगी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे का. उपाध्यक्ष ॲड जगदीश चौसाळकर, सचिव श्री. कमलाकरराव चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ. शैलेश वैद्य, सहसचिव श्री.भीमाशंकर शेटे, जेष्ठ सल्लागार प्रा.माणिकराव लोमटे,प्रा,एन.के गोळेगावकर,मेजर एस.पी.कुलकर्णी डॉ.गणेश पिंगळे,योगेश्वरी पॉलिटेक्निकचे प्राचार्य रमण देशपांडे व पॉलिटेक्निक मधील कर्मचारी उपस्थित होते.

### देवीची उपासना म्हणजेच महिला सक्षमीकरणाचा संदेश -सागर धस

पाटोदा । प्रतिनिधी

आष्टी-पाटोदा मतदारसंघाचे युवा नेते सागर धस यांनी पाटोदा येथील क्रांतीनगर भागातील संघर्ष मित्र मंडळ आयोजित जय तुळजाभवानी नवरात्र उत्सव कार्यक्रमास भेट देऊन देवीच्या महाआरतीचा मान स्वीकारला.



महाआरतीनंतर उपस्थित भाविकांना संबोधित करताना सागर धस म्हणाले, माता ही शक्ती,श्रद्धा व प्रेरणेचे मूळ आहे. आपल्या संस्कृतीत देवीची उपासना ही केवळ धार्मिक परंपरा नाही, तर स्त्रीशक्तीच्या गौरवाची साक्ष आहे. आज प्रत्येक क्षेत्रात महिला स्वतःची वेगळी ओळख निर्माण करत आहेत. शिक्षण, उद्योग, सामाजिक क्षेत्र, राजकारण अशा सर्वच क्षेत्रात महिला प्रभावी कामगिरी करत आहेत. देवीची उपासना म्हणजेच महिला सक्षमीकरणाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणे होय.आपण सर्वांनी महिलांचा सन्मान,शिक्षण व सुरक्षिततेसाठी कटिबद्ध राहिले पाहिजे.त्यांनी पुढे असेही अधोरेखित केले की,नवरात्र उत्सव हा भक्तीबरोबरच समाज जागृतीसाठी एक प्रभावी व्यासपीठ आहे.संघर्ष मित्र मंडळाने समाजातील ऐक्य, सलोखा आणि सांस्कृतिक परंपरेचा वारसा पुढे नेण्यासाठी घेतलेली पुढाकार स्तुत्य आहे.अशा उपक्रमांमुळे समाजात एकतेची भावना वृद्धिंगत होते. या कार्यक्रमास नगराध्यक्ष राजूभैय्या जाधव,आमदार सुरेश धस यांचे स्वीय सहाय्यक सोमीनाथ कोल्हे,कार्यक्रमाचे आयोजक नगरसेवक श्रीहरी गीते पाटील,अनिता श्रीहरी गीते पाटील संघर्ष मित्र मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते,महिला भगिनी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मनुरवाडी गावचा ग्रामसेवक दिनेश राऊत याला निलंबित करा

#### गटविकास अधिकाऱ्यांकडे मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मनुरवाडी गावचे ग्रामसेवक यांनी गावातील तरूणांना शिवीगाळ केल्याप्रकरणी ग्रामसेवकावर कडक कारवाई करून निलंबन करा अशी मागणी गटविकास अधिकारी यांचेकडे ग्रामस्थांच्या वतीने निवेदनाव्दारे करण्यात आली.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दि. ०५ ऑक्टोबर रविवारी रात्री १२:०० वाजता गावातील मंदिरासमोर येत ग्रामसेवकाने रात्री बारा वाजता अतिषबाजी केली. याबाबत गावातील नागरिकांनी, तरूणांनी विचारणा केली असता मुकुंद पवार, गणेश जाधव, योगेश पवार या तरुणांसह ग्रामस्थांना शिवीगाळ केली. त्यामुळे अशा हुल्लडबाज ग्रामसेवकावर कडक कारवाई करा व पदावरून निलंबीत करावे अशी मागणी ग्रामस्थानी गटविकास अधिका-यांकडे निवेदनाव्दारे केली असुन निवेदनावर माजी सरपंच जयराम गायकवाड ग्रामपंचायत सदस्य विकास हारकाळ माऊली शेळके पुरुषोत्तम पवार मुकुंद पवार, गणेश जाधव, योगेश पवार, ऋषिकेश शिंदे, कैलास शिंदे, विशाल पवार, नितीन थोरात, शहाजी पवार, गणेश थोरात, अमोल पवार, भिम थोरात, अतूल पवार, बापू श्रिखंडे, महेश शिंदे योगेश शिंदे, अनंता जगताप, भागवत हरकाळ, सुरेश ढगे यांच्या स्वाक्ष-या आहेत.

### शिरूरकासार पूरग्रस्तांना सहारा एज्युकेशन अँड रिसर्च फाउंडेशनच्या वतीने मदतीचा हात

#### शंभर किराणा किटचे वाटप

तलवाडा । प्रतिनिधी

अतिवृष्टी व सिंधफणा नदीला आलेल्या पुरामुळे घरांचे पूर्णपणे नुकसान झाले आहे. या पूरप्रकोपात नागरिकांचे भांडी, कपडे आणि इतर उपजीविकेच्या वस्तू वाहून गेल्या, ज्यामुळे अनेक कुटुंब उद्धस्त झाली आहेत. या कठीण काळात द .साहारा एज्युकेशन अँड रिसर्च फाउंडेशनच्या वतीने संस्थापक अध्यक्ष हाजी जुबेर भाई पुढाकाराने पूरग्रस्त गरीब कुटुंबातील शिरूर कासार,व बृमनात येळम येथे शंभर गोरगरिबांना किराणा किटचे वाटप करण्यात आले

या गावांमध्ये पूरामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. हाजी जुबेर भाई नेहमी समाज कार्यामध्ये अग्रेसर असणारा एक नेतृत्व आहे. कोरोना काळात त्यांनी



अनेक कुटुंबांना मदत केलेली आहे तर सदैव मदत कार्यांमध्ये तत्पर असतात त्यांच्या या समाजकार्यामुळे एक समाजात एकतेचा संदेश देण्यात येत आहे.जात-पात न पाहता अनेक संकटकाळी ते सर्वसामान्य माणसाचे कामे येणारा एक समाज सेवक म्हणून त्यांची ओळख आहे द.साहारा एज्युकेशन रिसर्च फाउंडेशन च्या माध्यमातून नेहमी ते मदतीचा हात देताना दिसत आहे. या वेळी मदत कार्यात शेख खदीर उर्फ खालू. शेख अजीम धन्ना. सय्यद शरीफ शेख शोएब शेख जोहेब. शेख जुनेद सय्यद इम्रान अबूबकर पठाण सय्यद आमेर शेख शफीक शेख. मोहसीन शेख नासेर शेख सलमान सय्यद सिद्दिक शेख सोनू नदीम शेख सैफ शेख समीर शेख जैद शेख शहेबाज शेख सोहेल शेख मुस्तकीम शेख मोहजीब इत्यादी समाजसेवक सहभागी झाले होते.

### कर्जमाफीसह एकरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई तात्काळ द्या -भाई ॲड.नारायण गोले

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पूर परिस्थिती निर्माण झाली असून बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे, गोदावरी नदीकाठच्या गावांना महापुराचा तडाखा बसल्याने गोदावरी काठच्या गावांसह शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे याशिवाय म्हशी,गाई, शेतातील पाण्याच्या मोटारी,गोठे, शेळ्या,मेंढ्या, कोंबड्या,आदींचे नुकसान झाले आहे,तसेच अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील तूर, कापूस,मूग,उडीद, सोयाबीन,केळी, फळबाग आदी पिकांचेही प्रचंड नुकसान झाल्याने शेतकरी पूर्णतः उध्वस्त झाला आहे. त्यामुळे दिवाळीच्या



तोंडावर शेतकऱ्यावर शिमगा करण्याची वेळ आलेली असताना, शासन शेतकऱ्याला जगण्यासाठी आधार द्यायला तयार नाही.त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा आकडा दिवसेंदिवस वाढत असतांना संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफी सह झालेल्या नुकसानीची एकरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई द्या,पूरग्रस्तांना एकरी लाख रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी तसेच फळबागा सह बागायती शेतीला एकरी लाख रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी, भूमिहीन शेतमजुरांना ५० हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्यात यावे,शेतकऱ्यांच्या उसातून प्रतिटन पंधरा रुपये कपात करण्याचा निर्णय त्वरित रद्द करण्यात यावा आदी मागण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड.नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली भाई राहुल सोळंके,भाई अशोक कुलकर्णी,भाई आनंत चव्हाण, भाई भास्कर कांबळे,प्रा. बालासाहेब येवले, भाई सलीम खा पठाण,भाई श्रीराम शेवाळे,जनार्धन कुदळे,सोनाजी जाधव,गोरख आढाव,ज्ञानोबा आगरकर,सतीश शेजुळ,चांगदेव शेजुळ आदींनी उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय माजलगाव यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली असून वरील मागण्या तात्काळ मान्य न केल्यास दि १० ऑक्टोबर रोजी सकाळी १०:०० वाजता पात्रुड येथील लोणगाव फाट्यावर तसेच दिनांक ११ ऑक्टोबर रोजी सकाळी १०:०० वाजता मोठेवाडी फाटा छोटीवाडी येथे शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

### जि.प.प्रा. शाळा रामनगर गुणवत्तापूर्ण पुरस्काराने सन्मानित

**तलवाडा । प्रतिनिधी**

**गेवराई तालुक्यातील तलवाडा केंद्रातील जि.प.प्रा. शाळा रामनगरला गुणवत्तापूर्ण उपक्रमशील शाळा पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. या पुरस्काराचे वितरण जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी गेवराई प्रवीण कुमार काळम पाटील, भीमाशंकर नांदुरकर जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी गेवराई, संजीवनी जोशी शिक्षण विस्तार अधिकारी गेवराई, अर्जुन बारगजे केंद्रप्रमुख तथा केंद्रीय मुख्याध्यापक केंद्र तलवाडा, माजी केंद्र प्रमुख बाजीराव मरकड, माजी मुख्याध्यापक शामराव मिसाळ, माजी केंद्रप्रमुख गर्जे गुरुजी तसेच इतर उपस्थित मान्यवरांचे हस्ते गौरविण्यात आले.**

हा पुरस्कार स्विकारण्यासाठी रामनगर शाळेचे मुख्याध्यापक गणेश चव्हाण, नितीन बेद्रे, शाळेच्या शिक्षिका मंगल मोरे, मनिषा जाधव, अंगणवाडी सेविका चंद्रकला नागरगोजे, तत्कालीन अध्यक्ष तथा



त्रिसुला फाऊंडेशनचे मिठ्ठू त्रिंबक आंधळे, अध्यक्ष सचिन गर्जे, सामाजिक कार्यकर्ते अंकुश मिसाळ यांसह इतर उपस्थित होते. हा पुरस्काराची सुरवात तलवाडा केंद्राचे केंद्रप्रमुख अर्जुन बारगजे यांच्या अभिनव संकल्पनेतुन झालेली आहे. बारगजे हे सदैव शिक्षकांना तसेच विद्यार्थांना प्रोत्साहित करण्यासाठी विविध अभिनव उपक्रमाचे आयोजन करत असतात.यावेळेस प्रवीण कुमार काळम यांनी शाळेचे कौतुक करतांना सांगितले की, जि.प. च्या शाळा या खर्या अर्थाने एक प्रेरणादायी शाळा आहेत. रामनगर शाळा ही एक प्रेरणादायी अशी शाळा आहे. या शाळेला मी अनेकदा भेट दिली आहे. हा पुरस्कार म्हणजे शाळेत नवीन येणार्या शिक्षकांसाठी एक उर्जादायी प्रेरणा आहे. यावेळेस केंद्रप्रमुख अर्जुन बारगजे यांनी सांगितले की, शिक्षकांचे कौतुक केल्यामुळे विद्यार्थांच्या, शाळेच्या गुणवत्तेमध्ये आणखी नव उर्जाने शिक्षक काम करतात.जि. प. प्रा. शाळा रामनगरच्या यशात मुख्याध्यापक गणेश चव्हाण, नितीन बेद्रे, शिक्षिका शितल नाईकवाडे, बाजीराव मरकड, शिक्षक टारफे सर, माजी मुख्याध्यापक शामराव मिसाळ, तत्कालीन समिती अध्यक्ष तथा शाळेत सदैव वेगवेगळे सामाजिक, शैक्षणिक उपक्रमास प्रोत्साहन देणारे त्रिसुला फाऊंडेशनचे मिठ्ठू त्रिंबक आंधळे, अध्यक्ष सचिन गर्जे, निवृत्ती लाड, नाकाडे भाऊ, सामाजिक कार्यकर्ते अंकुश मिसाळ अनेक माजी विद्यार्थी यांसह सर्व गावकरी यांचे यश आहे. या पुरस्काराने गौरविण्यात आल्याबद्दल शाळेचे विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.


#### टीसी हरवला आहे

विकास मारोती सवाशे यांचा ९ वी पासचा टी सी वडवणी ते बीड प्रवासादरम्यान हरवला आहे. तरी सापडल्यास ९१४६७७२५५५ या नंबरवर संपर्क करावा


cmyk

# शेतकरी कर्जमाफी ते ओला दुष्काळ!

## शेती प्रश्नावरुन वातावरण तापणार, १० ऑक्टोबरला राज्यभर एल्गार

राज्यातील विविध शेती प्रश्नावरुन किसान सभा आक्रमक झाली आहे. ओला दुष्काळ लागू करा, शेतकरी शेतमजुरांचे संपूर्ण कर्ज माफ करा व नुकसानीची रास्त भरपाई सर्व नुकसानग्रस्तांना द्या या प्रमुख मागण्यांसाठी दिनांक १० ऑक्टोबर २०२५ रोजी राज्यभर आंदोलन करण्याची हाक देण्यात आली आहे. अखिल भारतीय किसान सभा, सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स (सीटू) व अखिल भारतीय शेतमजूर युनियन या संघटनांच्या संयुक्त बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. याबाबतची माहिती किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले यांनी दिली आहे. ओल्या दुष्काळासंदर्भातील मागण्यांबाबत या तीनही संघटनांनी नुकताच मराठवाड्याचा संयुक्त दौरा केला. मराठवाडा विभागातील आठही जिल्ह्यांचा एक जबरदस्त मोर्चा या प्रश्नांसाठी ३० सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजी नगर आयुक्त कार्यालयावर काढण्यात आला. आता या आंदोलनाचा विस्तार करत संपूर्ण महाराष्ट्रभर सर्व तहसील व जिल्हाधिकारी कार्यालयांवर १० ऑक्टोबर रोजी मोर्चे काढून ओल्या दुष्काळा संदर्भातील प्रश्न केंद्रस्थानी आणले जाणार आहेत.



शेतकऱ्यांना प्रति एकर रु. ५०,००० रुपये पीक नुकसान भरपाई द्या, शेतमजुरांना श्रम नुकसान भरपाई म्हणून ३०,००० रुपये द्या, शेतकऱ्यांचे व शेतमजुरांचे संपूर्ण कर्ज माफ करा, कर्जमाफी योजनेत पीक व शेती कर्जा बरोबरच बचत गट, सावकारी व मायक्रो फायनान्स कर्जाचाही समावेश करा, विद्यार्थ्यांची फी माफ करा, पीक विम्याचे काढून टाकलेले ट्रिगर पुन्हा लागू करा, शेती, जनावरे, घरे, गोठे यांचे झालेले नुकसान सरकारी खर्चाने रोजगार हमी योजनेतून कामे काढत भरून द्या यासारख्या १० मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. राज्यात सध्या अतिवृष्टीमुळे शेतकरी शेतमजुरांच्या आत्महत्या वाढत आहेत. अतोनात नुकसान झाल्यामुळे शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण कामगार व कर्मचारी हवालदिल झाले आहेत.

राज्य सरकार मात्र अशा भीषण परिस्थितीत सुद्धा केवळ मदतीच्या वल्गना करत आहे. त्यामुळे शेतकरी, शेतमजूर व ग्रामीण श्रमिकांमध्ये सरकारच्या विरोधात तीव्र असंतोष खदखदतो आहे. हा असंतोष इतरत्र वळवण्यासाठी विविध शेतकरी जातींमध्ये आपसात संघर्ष भडकवले जात आहेत.

एकमेकांवर गलिच्छ पद्धतीने आरोप प्रत्यारोप करत शेती व मातीच्या प्रश्नांपासून लक्ष विचलित करण्याचे षडयंत्र केले जात आहे. अशा पार्श्वभूमीवर शेती व मातीचे प्रश्न केंद्रस्थानी राहावेत यासाठी या तीनही संघटना एकोप्याने रणांगणात उतरल्या आहेत. १० ऑक्टोबरच्या राज्यव्यापी आंदोलनानंतरही सरकारने वरील मागण्या मान्य केल्या नाहीत तर यापेक्षाही तीव्र आंदोलन उभे करण्याचा निर्णय या संघटनांनी घेतला आहे.

## किटकनाशकांच्या विविध प्रकारांची ओळख



किटकनाशके पिकांना हानिकारक किटकांपासून संरक्षण देण्यासाठी वापरली जातात. किटकनाशके त्यांच्या कार्यप्रणाली, रसायनिक घटक, आणि वापराच्या प्रकारानुसार विविध प्रकारात विभागली जातात. खाली किटकनाशकांचे प्रमुख प्रकार आणि त्यांची माहिती दिली आहे.

संपर्क किटकनाशक : हे किटकनाशक किटकाच्या शरीराच्या संपर्कात आल्यावर त्यांना मारते. किटक यांचा थेट संपर्क झाल्याशिवाय प्रभावी होत नाही. उदाहरणे: पायरेथ्रॉइड्स, कार्बरिल.

आंतरप्रवाही किटकनाशक :हे किटकनाशक पिकांच्या मुळांतून शोषले जाते आणि सर्व वनस्पतीमध्ये पसरते. किटक पिके खाताना हे किटकनाशक त्यांच्या शरीरात जाते आणि त्यांना मारते. उदाहरणे: इमिडाक्लोप्रिड, ॲसिफेट.

पोटातक्रियाजन्य किटकनाशक : हे किटकनाशक किटकांच्या पोटात गेले की प्रभावी ठरते. पिके खाल्यानंतर किटकांचे पचन संस्थान प्रभावित होते आणि त्यामुळे ते मरतात. उदाहरणे: कार्बामेट्स, ऑर्गनोफॉस्फेट्स.

श्वसनमार्गे किटकनाशक : हे किटकनाशक वायू स्वरूपात वापरले जाते आणि किटकांच्या श्वसनमार्गातून शरीरात प्रवेश करून त्यांना मारते. उदाहरणे: मिथाइल ब्रोमाईड, फॉस्फीन.

प्राकृतिक किटकनाशके : या किटकनाशकांमध्ये प्राकृतिक घटक असतात जे जैविक पद्धतीने किटकांचा नाश करतात. हे पर्यावरणपूरक आणि मानवी आरोग्यास सुरक्षित मानले जातात. उदाहरणे: नीम तेल, बॅसिलस थुरिंजिएन्सिस.

विकर्षक किटकनाशक : या किटकनाशकांचा उपयोग किटकांना पिकांपासून दूर ठेवण्यासाठी केला जातो. हे किटकांना आकर्षित न करता त्यांना दूर ठेवतात. उदाहरणे: डीईईटी, सायट्रोनेला तेल.

विकसनरोधक किटकनाशक : हे किटकनाशक किटकांच्या विकास प्रक्रियेवर प्रभाव टाकते. किटकांची वाढ, त्यांचे जीवनचक्र किंवा त्यांचे प्रजनन यावर नियंत्रण ठेवते. उदाहरणे: मेथोप्रीन, पायरीप्रोक्सीफेन.

सापेक्ष निवडक किटकनाशक : हे किटकनाशक काही विशिष्ट प्रकारच्या किटकांवर प्रभावी असतात आणि अन्य लाभदायक किटकांवर परिणाम करत नाहीत. उदाहरणे: बॅसिलस थुरिंजिएन्सिस.

विस्तृत-कार्यरत किटकनाशक : हे किटकनाशक अनेक प्रकारच्या किटकांवर प्रभावी असते, त्यामुळे एकाच वेळी अनेक किटकांचा नाश करण्यासाठी वापरले जाते. उदाहरणे: क्लोरपायरीफॉस, फेनीट्रॉथिऑन. किटकनाशकांची निवड पिकावर होणाऱ्या किटकांच्या प्रकारानुसार, पर्यावरणीय परिस्थितीनुसार, आणि पिकांच्या संवेदनशीलतेनुसार करावी लागते.

## भोपळा वर्गीय भाज्यांवरील रोगांचे नियंत्रण


साधारण भाजीपाला म्हटले की, डोळ्यापुढे मोठा भाजीपाला येतो. भोपळा वर्गीय भाजीपाला विचारात घेतला की, समोर भोपळ्यासारख्या गोल भाज्या येतात. भोपळा वर्गीय भाजीपाला प्रामुख्याने भोपळा, तिखट, लौकी, काकडी, लुफा, पेठा, परवल आणि काकडी इत्यादी वर्गात पडतात. मुख्य भोपळे आणि भोपळा वर्गीय भाज्यांचे मुख्य रोग साधारण पुढीलप्रमाणे आहेत.

लाल भोपळा बीटल : भोपळा भाजीपाला किडी जो प्रामुख्याने भोपळा वर्गाच्या पिकावर हल्ला करतो तो लाल भोपळा बीटल आहे. या लाल रंगाच्या झाडाची पाने लवकर टप्प्यात खाल्ल्याने नष्ट होते, त्यामुळे पिकाची वाढ थांबते. जैविक नियंत्रण कारण्यासाठी अर्धा कप लाकूड राख आणि अर्धा कप मिसळा आणि निवडले की अर्धा कप लिटर पाण्यात काही तास सोडा. शेतात फवारणीपूर्वी काही संक्रमित पिकावर फवारणी करावी. दुसरा पर्याय म्हणून, ५% एनएस साबणाने मिसळला जाऊ शकतो आणि ७ दिवसांच्या अंतराने वापरला जाऊ शकतो.

फळांची माशी : फळांची माशी ही मादी कीटक फळांच्या आत अंडी घालते, नंतर अळ्या हळूहळू फळात बोगदा बनवितात आणि लगदा खाण्यास सुरवात करतात, ज्यामुळे फळ सडणे, विकृत होणे व चालू होते. यावर प्रतिबंध करताना शेतातील तण नष्ट करा. मक्याची काढणी चारी बाजूंनी करावी कारण माशी उंच ठिकाणी बसायला आवडते. ज्यावर मालाथिऑन ईसी एमएल प्रमाणात अर्धा केजी चांगले आणि लिटर पाण्यात फवारणी केली जाते.

पांढरी माशी : हा किटक पांढरा पंख आणि पिवळ्या रंगाचा आहे, ही माशी एका मिली मीटरपेक्षा लहान आहे. ही माशी झाडाच्या पतीवर बसून रस शोषून घेते, लाळ तेथेच ठेवते, रोगाचा प्रादुर्भाव वाढतो. यावर प्रतिबंध करताना कीटकांना आकर्षित करण्यासाठी पिवळ्या रंगाचे सापळे आणि चिकट टॅग वापरा शिकारी पक्ष्यांना आकर्षित करण्यासाठी टी आकाराच्या बांबूचे खांब प्रति एकर १ नग वापरा. प्रति किलो बियाणे इमिडाक्लोप्रिड ७० डब्ल्यूएस १० ग्रॅम वापरल्याने चांगला फायदा होईल.

माइट बारुथी : हा किडा उघड्या डोळ्यांनी पाहणे शक्य नाही, एका ठिकाणी तो कळपात मोठ्या संख्येने असतो आणि उन्हाळ्यात काकडीसारख्या पिकांमध्ये जास्त प्रादुर्भाव होतो, याचा प्रादुर्भाव झाल्यामुळे झाडे त्यांचे बनवण्यास असमर्थ आहेत. अन्न आणि बडवार थांबते. यावर प्रतिबंध करण्यासाठी, पॉवर फवारणी यंत्राद्वारे पाण्याचे फवारणी केल्यास कोळी पिकापासून विभक्त होते, ज्यामुळे उद्रेक कमी होतो. स्पिरोमासिफेन ९ एससी ०.८ मिली प्रति लीटर किंवा डायकोफल १८.५ ई सी ५ मिली प्रति लिटर किंवा फेनप्रोथ्रीन ३० ईसी ०.७५ ग्रॅम प्रति लिटर १० ते १५ दिवसांच्या अंतराने शिंपडा जेणेकरून याचा प्रादुर्भाव कमी होऊ शकेल.



## अशा पद्धतीने करा वाटाणा पिकाची लागवड

वाटाणा हे थंड हवामानातील पीक असून या पिकाची महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. वाटाण्याचा उपयोग आहारात भाजी म्हणून केला जातो. हिरवे वाटाणे हवाबंद करून, गोठवून किंवा सुकवून बराच काळ साठविता येतात. हिरवे ओले वाटाणे वाळवून त्यापासून डाळ बनविता येते. वाटाण्यामध्ये कार्बोहाइड्रेट, प्रोटीन्स तसेच फॉस्फरस, पोटॅशियम, मेग्निशियम हि खनिजे आणि अ, ब, व क जीवनसत्वे भरपूर प्रमाणात असतात.

लागवडीसाठी जमीन : वाटाणा लागवडीसाठी मध्यम ते भारी निचऱ्याची जमीन निवडावी. जमिनीचा सामू ५.५ ते ६.७ इतका असावा. लागवडीपूर्वी उभी आडवी नांगरट करून २ ते ३ कुळवाच्या पाळ्या द्याव्यात. ढेकळे व्यवस्थित फोडून जमीन सपाट करून घ्यावी.

सुधारीत जाती व लागवडीचे अंतर : वाटाणा लागवडीसाठी बोनव्हिला, अरकेल, फुले प्रिया या वाणांची लागवड करावी. वाटाण्याची लागवड रब्बी हंगामात ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात करावी. सरी-वरंबे किंवा सपाट वाफे पद्धतीने लागवडीसाठी ३० १५ सें.मी. इतके अंतर ठेवावे. टोकण पद्धतीने लागवड करण्यासाठी प्रतिहेक्टरी ३०-४० कि.ग्रॅ. बियाणे लागते. तर पेरणी पद्धतीने लागवडीसाठी प्रतिहेक्टरी ७०-८० कि.ग्रॅ. बियाणे लागते.

बीजप्रक्रिया व खत व्यवस्थापन : कॅप्टन



किंवा कार्बेन्डाझिम ३ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणात बियास चोळावे. लागवडीपूर्वी १५:६०:६० किलो नत्र:स्फुरद:पालाश प्रतिहेक्टरी द्यावे. लागवडीनंतर एक महिन्याने १० किलो नत्र खताची मात्रा द्यावी. वाटाणा पिकाचा कालावधी वाणानुसार ८० ते १०० दिवसांचा असतो.

रोग व कीड व्यवस्थापन : वाटाणा पिकावर मावा, शेंगा पोखरणारी आली या किडींचा तर भुरी, मर रोग या रोगांचा प्रादुर्भाव आढळून येतो. मावा ही कीड हिरव्या रंगाची लागण असते. ते पानातून रस शोषून घेतात. त्यामुळे झाडे निस्तेज बनतात. शेंगा पोखरणारी अळी - हिरव्या रंगाची हि अळी प्रथम शेंगाची साल खाते व आत शिरते आणि दाणे पोखरून खाते. उपाययोजना - यासाठी मॅलॅथिऑन ५० ईसी, ५०० मिली किंवा फॉस्फॉमिडॉन ८५ डब्ल्यू ईसी, १०० मिली किंवा डायमेथोएन ३० ईसी, ५०० मिली किंवा मिथिलडेमेटॉन २५ ईसी, ४०० मिली, ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रती हेक्टरी फवारावे. पेरणीनंतर ३ आठवड्यांनी पहिली फवारणी करावी. भुरी रोगामुळे पिकाचे अतोनात नुकसान होते. या रोगात प्रथम पानांच्या दोन्ही बाजूंवर पांढरी पावडरीसारखी बुरशी दिसून येते. नंतर ती रोपाच्या सर्व हिरव्या भागावर जलद पसरते व झाडाची उत्पादनक्षमता त्यामुळे खालावते.

उपाय : यासाठी मार्फोलीन २५० मिली किंवा पानाय्त मिसळणारे गंधक ८० टक्के १२५० ग्रॅम किंवा डिनोकॅप ४० डब्ल्यू पी ५०० ग्रॅम प्रती हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. किंवा गंधकाची भुकटी ३०० मेश प्रतिहेक्टरी २० किलो या प्रमाणात धुरळावी. नंतर १५ दिवसांच्या अंतराने फवारणी / धुरळणी करावी. रोगास प्रतिबंधक अशा जातींचा वापर करावा.

मर रोग या रोगाचा प्रसार जमिनीतील बुरशीमुळे होतो. रोगग्रस्त झाड पिवळे पडून वाळते. उपाय म्हणून पेरणीपूर्वी बियास थायरम हे बुरशीनाशक औषध प्रति किलोस ३ ग्रॅम या प्रमाणात चोळावे.

उत्पादन : वाटाणा पिकाचे वाणपरत्वे हिरव्या शेंगाचे- ४ ते ७ टन तर वाळलेले वाटाणे १.५ ते २ टन इतके प्रति हेक्टरी उत्पादन मिळते.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### वेद दिन

### महत्वाच्या घटना

१६७९ : सिद्दी जौहर आणि इंग्रजांचा मारा रोखत मराठ्यांनी खांदेरी किल्ल्याभोवती एक मीटर उंचीचा तट उभारून पूर्ण केला.
१८१४ : दुसर्या बाजीरावाने पांडुरंग कोल्हटकराच्या साहाय्याने 'उंदेरी-खांदेरी' किल्ल्यांचा ताबा परत मिळवला.
१८२२ : ब्राझिलला (पोर्तुगालपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९०६ : 'बँक ऑफ इंडिया'ची स्थापना झाली. ही भारतात स्थापन झालेली पहिली स्वदेशी व्यापारी बँक आहे.
१९२३ : आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी पोलिस आयोग (आय. सी. पी. सी) ची स्थापना व्हीयना येथे करण्यात आली.
१९३१ : दुसर्या गोलमेज परिषदेची सुरूवात झाली.
१९७८ : मधुमेह नियंत्रित करण्यासाठी उपयोगी पडणारे इन्सुलिन प्रथमच जनुक अभियांत्रिकी पद्धतीने तयार करण्यात यश.
१९७९ : दिवाळखोरी टाळण्यासाठी 'ख्रायसलर कॉर्पोरेशन'ने अमेरिकन सरकारकडे १ बिलियन डॉलर्सची मागणी केली.
२००५ : इजिप्तमधे पहिल्यांदाच बहुपक्षीय सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या.
२००९ : भारतीय बिलियर्डस खेळाडू पंकज अडवाणी यांनी वर्ल्ड प्रोफेशनल बिलियर्ड्सचे जेतेपद जिंकले.
२०१८ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्ली येथे नीती आयोग द्वारे आयोजित वैश्विक गतिशीलता शिखर संमेलनाचे उद्घाटन केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९१ : उमाजी नाईक पहिला क्रांतिकारक स्वातंत्र्यसैनिक (मृत्यू: ३ फेब्रुवारी १८३२)
१८०७ : न्यूझीलंड देशाचे पहिले पंतप्रधान हेन्री सिवेल यांचा जन्म. (मृत्यू: १४ मे १८७९)
१८८७ : साहित्य अकादमी पुरस्कार व पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय संस्कृत विद्वान आणि महान दार्शनिक संस्कृत-तंत्र अभ्यासक, भारतीय शास्त्रज्ञ आणि तत्वज्ञ गोपीनाथ कविराज यांचा जन्मदिन.
१८२२ : रामकृष्ण विठ्ठल तथा भाऊ दाजी लाड प्राच्यविद्या पंडित, पुरातत्त्वज्ञ, कर्ते समाजसेवक आणि कुशल धन्वतंरी, ग्रँट मेडिकल कॉलेजच्या पहिल्या तुकडीतील विद्यार्थी (मृत्यू: ३१ मे १८७४)
१८२६ : बंगाल नवजागृतीचे प्रसिद्ध भारतीय बंगाली भाषिक लेखक राजनारायण बसु यांचा जन्मदिन.
१८४९ : बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर हिन्दुस्तानी शास्त्रीय गायक, ग्वाल्हेर गायकीचा महाराष्ट्रात प्रचार केला (मृत्यू: ८ फेब्रुवारी १९२७)
१९१२ : डेव्हिड पॅकार्ड ह्युलेट पॅकार्ड कंपनीचे एक संस्थापक (मृत्यू: २६ मार्च १९९६)
१९१५ : डॉ. महेश्वर नियोग प्रख्यात आसामी साहित्यिक आणि इतिहासकार, पद्मश्री (१९७४), आसाम साहित्य परिषदेचे अध्यक्ष (मृत्यू: १३ सप्टेंबर १९९५)
१९१७ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय चिकित्सक व वैज्ञानिक बानो जहाँगीर कोयाजी यांचा जन्मदिन.
१९२५ : भानुमती रामकृष्ण तामिळ व तेलगू चित्रपटांतील अभिनेत्री, दिग्दर्शक, निर्माती, गीतकार, संगीतकार, गायिका व लेखिका (मृत्यू: २४ डिसेंबर २००५)
१९३३ : इला भट्ट मॅगसेसे पारितोषिक विजेत्या समाजसेविका, वकील व 'सेवा' ' या संस्थेच्या संस्थापिका
१९३४ : सुनील गंगोपाध्याय बंगाली कवी व कादंबरीकार (मृत्यू: २३ आक्टोबर २०१२)
१९३४ : बी. आर. इशारा चित्रपट दिग्दर्शक आणि पटकथालेखक (मृत्यू: २५ जुलै २०१२)
१९४० : चंद्रकांत खोत लेखक व संपदक
१९६३ : अशोकचक्र पुरस्कार सन्मानित शूरवीर भारतीय वैमानिक नीरजा भनोट यांचा जन्मदिन.
१९६७ : भारतीय-इंग्लिश अकाउंटंट आणि राजकारणी आलोक शर्मा यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६०१ : विल्यम शेक्सपियर यांचे वडील जॉन शेक्सपियर यांचे निधन.
१८०९ : थायलंडचा राजा बुद्ध योद्फा चुलालोके यांचे निधन.
१९५३ : भगवान रघुनाथ कुळकर्णी ऊर्फ 'फुलारी' ऊर्फ 'बी. रघुनाथ' लेखक व कवी (जन्म: १५ ऑगस्ट १९१३)
१९७९ : जनार्दन ग्यानोबा तथा 'जे. जी.' नवले भारतीय कसोटी क्रिकेट संघाचे पहिले यष्टिरक्षक(जन्म: ७ डिसेंबर १९०२)
१९९१ : रवि नारायण रेड्डी 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया' चे सहसंस्थापक (जन्म: ५ जून १९०८)
१९९४ : टेरेन्स यंग, चिनी इंग्लिश दिग्दर्शक आणि पटकथाकार (जन्म: २० जून १९१५)
१९९७ : मुकूल आनंद तांत्रिक करामतीचे जादूगार म्हणून नाव कमावलेले हिन्दी चित्रपट निर्माते व दिग्दर्शक (जन्म: ११ आक्टोबर १९५१)
१९९८ : गुजरात, मध्य प्रदेश आणि पॉन्डिचेरी या केंद्र शासित प्रदेशाचे माजी राज्यपाल के. एम चांडी यांचे निधन.
२०१३ : भारतीय परराष्ट्र सचिव, दिल्ली, अंदमान आणि निकोबार बेटांचे माजी उपराज्यपाल आणि त्रिपुरा, गोवा आणि उत्तर प्रदेश राज्यांचे माजी राज्यपाल रोमेश भंडारी यांचे निधन.

cmyk

राज्य लोकतंत्र

# मराठवाडा वृत्तांत

मंगळवार दि.७ ऑक्टोबर २०२५ | ५





# शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका : अबादास दानवे

## केंद्राला अजून प्रस्ताव का पाठवला नाही? असा केला सवाल

हिंगोली । प्रतिनिधी

राज्यात अतिवृष्टीमुळे शेतजमीनी खरडून गेल्या. पिकांचे नुकसान झाले. जनावरेही वाहून गेली. या परिस्थितीतही केंद्र सरकारने प्रस्ताव पाठवण्याची मागणी केली. पण राज्याचा प्रस्ताव अद्याप का गेला नाही असा प्रश्न आहे. केंद्र व राज्य सरकारने अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या सहनशिलतेचा अंत पाहू नये. अन्यथा त्याचे परिणाम भोगावे लागतील. असा इशारा विधान परिषदेतील माजी विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी सोमवारी ता. ६ येथे दिला आहे. हिंगोली येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित बैठकीनंतर अंबादास दानवे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी ठाकरे गटाचे जिल्हा संपर्क प्रमुख बबनराव थोरात, माजी खासदार ॲड. शिवाजी माने, सहसंपर्क प्रमुख विनायक भिसे, जिल्हा प्रमुख अजय उर्फ गोपू पाटील सावंत, संदेश देशमुख, माजी आमदार डॉ. संतोष टारफे, राजेश पाटील गोरेगावकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



यावेळी बोलताना दानवे म्हणाले की, राज्यात अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले आहे. मात्र अद्यापही शासनाकडून मदत जाहिर झाली नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी दिल्लीत जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. त्यांनी त्यांना मदतीचा प्रस्ताव पाठविण्यास सांगितले. मात्र अद्यापही प्रस्ताव का गेला नाही? त्यातून राज्य शासनाची नियत खराब असल्याचे स्पष्ट होते. केंद्राने जाहीर केलेली २५०० कोटी रुपयांची मदत गेली कुठे? असा सवालही त्यांनी केला. सरकारला शेतकऱ्यांच्या दु:खाशी देणे घेणे नाही, असा आरोपही त्यांनी केला. मराठवाड्यासह राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजीनगर येथे हंबरडा मोर्चा काढला जाणार आहेत. त्यापूर्वी ता. ८ ऑक्टोबर रोजी राज्यात सर्व तहसील व जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राज्यातून जाणाऱ्या शक्तिपीठ महामार्गाबद्दल बोलताना त्यांना सरकारवर टिका केली. शेतकऱ्यांनी त्यांची एक इंचही जमीन मोजू देऊ नये असे आवाहन त्यांनी केले. शक्तिपीठ महामार्गाच्या प्रश्नावर लवकरच आंदोलन केले जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.र ज्यातील कायदा व सुव्यवस्थेबाबत बोलतांना ते म्हमाले की, पुणे येथे पोलिस कर्मचाऱ्यावर हल्ला झाल्याची घटना घडली आहे. जनतेचे रक्षण करणाऱ्यांवरच हल्ले होत असतील तर न्याय मागायचा कोणाकडे असा सवाल त्यांनी केला. राज्यात कायदा व सुव्यवस्था ढासळली असल्याचा आरोप त्यांनी केला. यावेळी त्यांनी आयआरएस अधिकारी समीर वानखेडे सुपाऱ्या घेणारा अधिकारी असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

# दरोड्याच्या तयारीत असणारे बीड जिल्ह्यातील ५ आरोपी पकडले



धाराशिव । प्रतिनिधी

पोलिस अधिक्षक रितु खोखर, अपर पोलीस अधिक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विनोद इज्जपवार यांचे आदेशावरून सपोनि अमोल मोरे, सपोनि सचिन खटके यांचे पथक गुन्ह्यांप्रतिबंध करणेकरिता तुळजापुर शहरात गर्दीचे ठिकाणी पायी पेट्रोलिंग करीत असताना दरोड्याच्या तयारीत ५ इसमाना अटक केली आहे.पकडण्यात आलेले आरोपी हे बीड जिल्ह्यातील आहेत.

स्थानिक गुन्हेशाखेच्या पोलिसांना नळदुर्ग ते तुळजापुर बायपास रोडवर एका पांढ-या रंगाचे चारचाकी वाहनामध्ये काही इसम दरोडा टाकण्याचे तयारीत थांबलेले आहेत अशी माहिती मिळाल्याने लागलीच सदरची माहिती वरीष्ठांना कळवून पथकाने माहिती मिळालेल्या ठिकाणी बायपास रोडवर सायंकाळी ७.१५वा. गेले असता तेथे त्यांना एक पांढरे रंगाची स्वीफट कार क्र. एम. एच. ११ एके ९६२१ ही दिसली पथकाने त्यांच्या गाडया थांबवुन गाडीमधुन उतरून सदर कारकडे जात असताना पथकामधील स्टाफ ला पाहुन कारमधील दोन इसम उतरून पळुन जाण्याचे तयारीत असताना त्यांना जागीच पकडले.तसेच कारमधील तिघांनाही पकडुन त्या पाच इसमाना त्यांचे नाव गाव व सदर ठिकाणी थांबण्याचे कारण विचारले असता त्यांनी सुरवातील उडवाउडवीचे उत्तरे दिली. रोहीत ऊर्फ तात्या अंकुश गायकवाड (वय ३६ वर्षे ), अमर आसाराम गायकवाड (वय २३ वर्षे रा. नळवंडी) राजेश जाधव (बीड), राजाभाऊ ज्ञानदेव यादव (वय २५) ) प्रशांत दिलीप डाके (वय २५ ) हे सर्वजण बीड जिलह्यातले आहेत. या पैकी काहीजणांवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. सर्वांना ताब्यात घेवुन त्यांचेवर तुळजापुर पोलिस ठाण्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.सदर कामगिरी पथकामध्ये पो.नि.इज्जत पवार, स.पो.नि. अमोल मोरे, स.पो.नि. सचिन खटके, पोहेकॉ विनोद जानराव, समाधान वाघमारे, अमोल निंबाळकर, दत्ता राठोड, दया गादेकर, नितीन जाधवर, बबन जाधवर, शोभा बांगर, पो.कॉ. यादव, पो.कॉ. आंधळे, महेबूब अरब, सुभाष चौरे, विनायक दहीहंडे यांचा समावेश होता.

# पालकमंत्र्याकडून नुकसानग्रस्त भागाची पाहणी

लातूर । प्रतिनिधी

राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी रेणापूर तालुक्यातील हारवाडी आणि लातूर तालुक्यातील महापूर येथील नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. तसेच यावेळी शेतकरी, ग्रामस्थांकडून नुकसानीची माहिती घेतली.हारवाडी येथे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकरी अधिकारी राहुल कुमार मीना, उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार प्रशांत थोरात, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बी. एम. थोरात, कार्यकारी अभियंता देवेंद्र नीलकंठ, गट विकास अधिकारी सुमित जाधव यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. तर महापूर येथे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकरी अधिकारी राहुल कुमार मीना, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शिवसांब लाडके, उपविभागीय अधिकारी रोहिणी न-हे-विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे, गट विकास अधिकारी श्याम गोडभरले यांची उपस्थिती होती.



हारवाडी येथे पुरामुळे खरडून गेलेल्या जमिनींचे पंचनामे तातडीने पूर्ण करावेत. तसेच येथील शेतक-यांना नदी ओलांडून शेतामध्ये जाण्याकरिता नाबार्डच्या योजनेतून पूल उभारण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना पालकमंत्री भोसले यांनी दिल्या. तसेच गावातील जलजीवन मिशन योजनेतील विहिरीचे काम तातडीने पूर्ण करण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी, असेही त्यांनी सांगितले. महापूर येथे अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या सोयाबीन पिकाची, तसेच मांजरा नदीवरील बरेजची पाहणी केली. यावेळी नदीकाठावरील शेतक-यांनी मांडलेल्या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे पालकमंत्री भोसले यांनी यावेळी सांगितले. अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतक-यांवर कोसळलेले संकट मोठे आहे. मात्र, या संकटाने खचून न जाता, शेतक-यांनी तणावातून बाहेर यावे. शेतपिकांच्या नुकसानीपोटी जास्तीत जास्त मदत देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

# वर्षावास निमित्त मिलिंद प्रश्न ग्रंथवाचन व महिला उपासिका शिबिराची सांगता

अंबड । प्रतिनिधी

युवराज निवास ठाकूर नगर, अंबड येथे वर्षावास काळात सलग तीन महिने ग्रंथ वाचन करण्यात आले. रविवार दि. ५ /१०/ २०२५ रोजी या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. तत्पूर्वी विचार पिठावर भदंत राजरत्न यांनी त्रिसरण पंचशील उपस्थितांना दिले. आयु.प्रकाश घायतडक व सुनिता घायतडक यांनी प्रथम तथागत भगवान बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन केले व भंते राजरत्न यांना चिवरदान करून त्यांना वंदन केले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मत्स्योदरी महाविद्यालय अंबड येथील प्राचार्य डॉ. मिलिंद पंडित सर व गोदावरी महाविद्यालय अंबड येथील अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ. मारोती तेगमपुरे सर उपस्थित होते.



यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयु. प्रकाश घायतडक यांनी केले. प्राचार्य डॉ. मिलिंद पंडित यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाविषयी सखोल असे मार्गदर्शन केले तर प्राध्यापक डॉ. मारोती तेगमपुरे यांनी भारताचे संविधान आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराविषयी सखोल असे मार्गदर्शन केले. याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभा जालना सरचिटणीस भास्करराव साळवे यांनी भगवान बुद्धांच्या अश्विन पौर्णिमेनिमित्त घडलेल्या विविध प्रसंगावर सखोल असे मार्गदर्शन केले.तसेच हेमंत पहाडे सखाराम कोळे भिमराव बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाचे आयोजक आयु. प्रकाश घायतडक व सुनिता घायतडक यांचा भारताचे संविधान हा ग्रंथ देऊन धम्म श्रावक संघातर्फे यथोचित सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे ग्रंथवाचक भारतीय बौद्ध महासभेचे अंबड तालुका अध्यक्ष यु. आर.येडे यांचा सुद्धा भारताचे संविधान हा ग्रंथ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे भारतीय बौद्ध महासभेचे तालुका सरचिटणीस डॉ.राहुल बागुल यांच्यातर्फे वैद्यकीय क्षेत्रामध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा पदक देऊन सन्मान करण्यात आला. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय ससाने यांनी केले. तसेच या कार्यक्रमात घेण्यात आलेल्या दहा दिवसीय महिला उपासिका प्रशिक्षण शिबिराचा समारोप करून उपस्थित महिला उपासिकांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. ग्रंथ वाचन समारोप कार्यक्रम प्रकाश घायतडक, प्रकाश पटेकर, विजय ससाने, शिवाजी कांबळे, चंद्रकांत दिलपाक, रामदास वाढवे, उत्तमराव येडे, अच्युतराव उघडे ,सुधाकर घायतडक, मधुकर म्हस्के, रमेश म्हस्के, सुधाकर खरात, भागवत चाबुकस्वार, श्याम तुपे तसेच सर्व महिला उपासिका इत्यादींनी परिश्रम घेतले. शेवटी सरणतय गाथा घेऊन कार्यक्रमाची यशस्वी सांगता करण्यात आली. रात्री उशिरापर्यंत उपस्थित सर्व श्रावक संघ व उपासकांना भोजनदान करण्यात आले.

# संत रामदास महाविद्यालयात पूरग्रस्ताच्या मदतीकरिता डिझास्टर फंड संकलन

घनसावंगी । प्रतिनिधी

येथील संत रामदास महाविद्यालयात करियर कट्टाच्या वतीने पूरग्रस्ताना मदत करण्याकरिता डिझास्टर फंड संकलन करण्यास आज सुरुवात करण्यात आली यावेळी यामागील भूमिका प्रास्ताविकातुन डॉ. प्रशांत सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना दिली. याशिवाय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र परदेशी यांनी अति पावसामुळे झालेल्या नुसकानीचे स्वरूप व नुसकानग्रस्त नागरिकाविषयीं आपले दायित्व वा विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून सढळ हाताने मदत करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षेकत्तर कर्मचारी यांनी सदरील आवाहनास प्रतिसाद देऊन मदत केली. सदरील मदत महाराष्ट्र शासनाकडे करियर कट्टा या उपक्रमाद्वारे सुपूर्त करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गजानन अवचार, श्री भगवान मिरकड, डॉ. बाप्पासाहेब मस्के, प्रा. संदीप जिगे, डॉ. राधेश्याम राऊत, डॉ. विजयानंद जामकर, प्रा. माधव गुट्टे, डॉ. प्रल्हाद होंडे, प्रा. अर्जुन डोईफोडे, डॉ. राजेंद्र मोरे, डॉ. योगेश देसाई, डॉ. सुभाष पवार, प्रा. चत्रभूज गोडबोले आदी उपस्थित होते.

# प्रत्येक पान, फूल, झाडाच्या माध्यमातून आनंदवन बोलतेय

## आनंदवन महोत्सवाच्या समारोपप्रसंगी अमोल सातपुते यांचे प्रतिपादन

अहिल्यानगर । प्रतिनिधी

मी साधारण तीन-चार वर्षांपूर्वी इककडे आलो होतो आणि तेव्हा आनंदवन नुकतच बाळस धरत होते. आज एकाच वाक्यात इथले प्रत्येक पान फुल, प्रत्येक झाड, फलक सुद्धा बोलतोय. निर्जीव वस्तूही बोलत आहे., त्या माध्यमातून आनंदवन बोलत आहे, असे प्रतिपादन सातारा येथील उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांनी केले.

पाथर्डी तालुक्यातील मांडवे येथील आनंदवनात दोन दिवसीय आनंदवन महोत्सवाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर सतीश काळे महाराज, सिद्धार्थ सोनवणे, निरंजन सेवाभाावी संस्थेचे जयेश कासट, वनविभागाचे गणेश मिसाळ, अरुण साबळे, मांडवेचे सरपंच राजेंद्र लवांडे, केडगावचे उद्योजक विनायक गाडेकर, नामदेव गाडेकर यांच्यासह श्री तीलोक जैन विद्यालयाचे विद्यार्थी शिक्षक, निसर्गावर प्रेम करणारे असंख्य नागरिक उपस्थित होते. उपवनसंरक्षक सातपुते म्हणाले, निसर्ग संपन्न अशा या आनंदवनाचा आपण अनुभव या ठिकाणी घेत आहोत. आणि त्यात भर पडली आहे ती सिद्धार्थ



वडाची. जे की अजरामर झाले. त्याचे ७५ छोटे छोटे बाळपण आहेत. आपण जीवनात सगळं काही आनंद मिळवण्यासाठी करतो सुख मिळवण्यासाठी करतो. परंतु आनंद म्हणजे काय, आनंदाची प्रत्येकाची व्याख्या वेगळी असेल सुखाची प्रत्येकाची व्याख्या वेगळी असेल परंतु या बाल आनंद परिवार आणि आनंदवनाच्या परिवाराकडे बघितल्यानंतर आनंद आणि समाधान म्हणजे काय ते कळते. सिद्धार्थ सोनवणे म्हणाले, आज मला आपण सर्वांनी मला जे प्रेम दिले, त्याच्या पाठिमागे माझा देव आहे. मी आज माझ्या देवाजवळ बसलो आहे, तो म्हणजे अमोलजी सातपुते. माझ्या आयुष्यामध्ये मला प्रामाणिक अधिकारी जो वाटला, जो निसर्गाची एकरूप आहे असं वाटलं ते म्हणजे अमोल सातपुते. माणसांच्या गरजा कमी असल्या की तो समाधानी असतो. यावेळी जयेश कासट यांनीही आनंदवनसाठी कायम मदत करु, असे आश्वासन दिले. पत्रकार चंद्रकांत गायकवाड यांनीही मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचालन तुकाराम भगत, गणेश कांबळे, लहू बोराटे यांनी, तर आभार संदीप राठोड यांनी मानले. यावेळी निसर्गासाठी योगदान देणार्या निसर्ग चित्रकार राम फड, अमित गायकवाड, पत्रकार चंद्रकांत गायकवाड, निसर्ग मित्र शुभम चंदनशिव यांचा स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. पुर्नरोपण केलेला वडाचे आता सिद्धार्थ वड असे नामकरण यावेळी चला हवा येऊ द्या फेम श्वेता पारखे आणि अमोल राठोड यांनी निसर्ग वाचवण्याबाबतचा संदेश नाटिकेतून सादर केला. याला उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली. तर पाथर्डी येथे वादळाने पडलेला १०० वर्षे जुन्या वटवृक्षाचे आनंदवनात पुर्नरोपण करुन त्याचे सिद्धार्थ वड असे नामकरण उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांच्या हस्ते करणयात आले.

# दिव्यांगाला अपमानिक केल्याने पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

जालना । प्रतिनिधी

दिव्यांगाला अपमानिक केल्यामुळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पायाने दिव्यांग असलेली महीला आपल्या पती सोबत माहेरी राहत असल्याने मावस मामाकडुन सतत लंगडी म्हणुन हिनवल्या जात असल्याने या दिव्यांग महीलेच्या फिर्यादीवरुन तालुका पोलीस ठाण्यात मावस मामा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आलाय. शहरातील दिव्यांग महीला सविता मच्छिद्र बोराडे ही आपल्या पती सोबत वडील नामे त्रिंबक गांधले यांचे घरी म्हाडा कॉलनी येथे राहते. माञ तेथे जवळच राहणारा दिव्यांग महीलेचा मावस मामा जगदीश किसन अवसारे हा नेहमी दिव्यांग महीलेला लंगडी, लंगडी असे म्हणुन हिणवत असतो.

०४ ऑक्टोबर रोजी रात्री ११:०० वाजेच्या सुमारास ही महीला आई-वडीलांचे घरी असतांना तिचा मावस मामा जगदीश किसन अवसारे हा नेहमी सारखे सार्वजनिक ठिकाणी दिव्यांग महीलेचा अपमान करण्याच्या उद्देशाने लंगडी म्हणाला तेव्हा सदरील दिव्यांग महीलेने तुम्ही मला सारखे सारखे लंगडी लंगडी का म्हणता असे बोलले असता जगदीश किसन अवसारे यांने मला शिवीगाळ करुन तुम्ही येथुन निघुन जा नाहीतर तुला व तुझ्या परीवाराला जिवे मारुन टाकीन अशी धमकी दिली. त्यामुळे सदरील महीला लहानपणापासुन अंपग असल्याचे वडीलांच्या नावाचे दिव्यांग प्रमाणपञाच्या आधारे तालुका पोलीस ठाणे गाठुन मावस मामाच्या विरोधात दिलेल्या तक्रारीवरुन जगदीश किसन अवसारे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/५७२
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २५/०९/२०२५

नाव बदलण्याचा

## जाहिरनामा

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) नवनाथ पांडुरंग पवार सर्व्हे नं.-८० सहन प्लॉट नं. १० नं.प.मि.नं.१८-११०-१०/१ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-११०-१०/१) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- १५ मिरटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम : याच प्लॉटमधील भाग
दक्षिण- प्लॉट नंबर १० मधील भाग
उत्तरः याच प्लॉटमधील सुनिल सोपान जाधव यांनी खरेदी केलेला भाग

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/५७१
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २५/०९/२०२५

नाव बदलण्याचा

## जाहिरनामा

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) सुनिल सोपान जाधव सर्व्हे नं.-८० सहन प्लॉट नं. १० नं.प.मि.नं.१८-११०-१०/१ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-११०-१०/१) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- १५ मिरटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम : याच प्लॉटनंबर मधील भाग
दक्षिण- याच प्लॉटमधील नवनाथ पंडुरंग पवार यांनी खरेदी केलेला भाग
उत्तरः प्लॉट नंबर ११

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

# परभणी जिल्ह्यात मुसळधार अनेक रस्ते पाण्याखाली; घरातही शिरले पाणी

परभणी । प्रतिनिधी

आठ दिवसांची विश्रांती घेतल्यानंतर परभणी जिल्ह्यात पुन्हा एकदा पावसाचा हाहाकार बघायला मिळाला आहे. जिल्ह्यातील अनेक भागात पहाटे झालेल्या मुसळधार पाऊस झाला असून या पावसामुळे शहरातील अनेक भागांमधील रस्त्यांसह ग्रामीण भागातील शेत शिवारही पाण्याखाली गेली आहेत. तर अनेकांच्या घरात पाणी शिरल्याचे चित्र पुन्हा एकदा निर्माण झाले आहे. दोन आठवडे सतत पाऊस राहिल्याने जिल्ह्यातील अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाल्याचे पाहण्यास मिळाले होते. दरम्यान मागील आठवडाभर पावसाने विश्रांती घेतली होती. यामुळे पूरस्थिती ओसरली होती. तर शेतक-यांची देखील पीक काढणीची लगबग पाहण्यास मिळत होती. मात्र परभणी जिल्ह्यात पहाटे पुन्हा एकदा मुसळधार पावसाने हाहाकार माजवला आहे. शहरासह जिल्ह्यातील शेत शिवार पुन्हा पाण्याखाली गेले आहेत.

शहरातील अनेक घरात पाणी मध्यरात्री पासून मुसळधार पाऊस पडत आहे. तर शहरातील अनेक रस्त्यावर पाणीच पाणी झाले आहे. यामुळे अनेक घरात पाणी गेले आहे. परभणी शहरातील संत गाडगेबाबानगर, साईबाबानगर, अक्षदा मंगल कार्यालय परिसर आधी नगरात मोठ्या प्रमाणात पाणी घुसल्याने संसार उपयोगी वस्तूंचे नुकसान झाले आहे. गाडगेबाबा नगरमध्ये महानगरपालिका पाणी काढण्याचे प्रयत्न करत आहे. सतत पडत असलेल्या पावसामुळे वाचलेले सोयाबीन शेतक-यांनी काढले खरे मात्र रात्रीच्या पावसाने तेही भिजले. मानवत तालुक्यातील कोल्हावाडी येथील शेतकरी पांडुरंग पंडितराव भिसे यांच्या शेतात काल दिवसभर सोयाबीन कापून मळणी यंत्राच्या साह्याने सोयाबीन काढलं रात्री शेतात ठेवलं होतं. पहाटे मुसळधार पाऊस झाला आणि हे सोयाबीन वाचवण्यासाठी शेतक-यांनी चक्क मांडी एवढ्या पाण्यातून सोयाबीनचे पोते बाहेर काढले आहेत.

# लक्ष्मीनारायण मंदिर ट्रस्टची ६५ एकर जमीन अट्टल कुटुंबाकडून मुक्त

## उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांचा धाडसी निर्णय

**गेवराई, बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील देवस्थान जमिनी संदर्भातील घोटाळ्यांनी आता गंभीर स्वरूप धारण केलं असून, अशाच एका मोठ्या प्रकरणात गेवराई येथील श्री लक्ष्मीनारायण मंदिर ट्रस्टची ६५ एकर देवस्थान जमीन अट्टल कुटुंबाच्या ताब्यातून मुक्त झाली आहे. उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी दिलेल्या निर्णयानुसार, ही जमीन पुन्हा मंदिराच्या नावे नोंदवण्याचे आदेश तहसीलदारांना देण्यात आले आहेत.

**बनावट फेरफारातून जमीन बळकावण्याचा प्रकार**

श्री लक्ष्मीनारायण मंदिर ट्रस्टच्या नावे मौजे कोल्हेर व लुकामसला येथे एकूण ११७ एकर जमीन आहे. यातील मौजे कोल्हेर गावातील गट नं. ५१ मधील ६५ एकर जमीन राधेश्याम अट्टल यांनी महसूल विभागातील कर्मचाऱ्यांच्या मदतीने बनावट फेरफार करून आपल्या नावावर केली होती. शेतकरी श्रीमती कौसाबाई बबन यांच्या नावाने दाखल असलेला ३२१ हा बनावट फेरफार मंदिराच्या ७/१२ उताऱ्यावर दाखवून, मंदिराच्या नावाची नोंद रद्द करण्यात आली होती.

**धर्मदाय आयुक्त कार्यालयाकडे तक्रार; अखेर मिळाला न्याय**

या प्रकाराची तक्रार धर्मदाय उपआयुक्त कार्यालय व जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली होती. त्यानंतर सदर प्रकरणाची सुनावणी २५ मार्च २०२५ रोजी उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या कार्यालयात पार पडली.



सुनावणीत अट्टल यांनी फेरफार चुकीचा असल्याचे कबूल केले. त्यावर निर्णय देताना जाधव यांनी फेरफार तत्काळ रद्द करून मूळ देवस्थानाची नोंद पूर्ववत करण्याचे आदेश दिले.

**मंदिराच्या उत्पन्नावर डल्ला**

अनेक वर्षांपासून राधेश्याम अट्टल हे देवस्थानाच्या जमिनीचे उत्पन्न स्वतःकडे वळवत असल्याची माहिती समोर आली आहे. या फसवणुकीविरोधात गेवराई पोलीस ठाण्यातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, अद्याप पोलिसांकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, ही बाब चिंताजनक आहे.

**देवस्थान जमिनींचे रक्षण कोण करणार ?**

बीड जिल्ह्यात अनेक देवस्थान जमिनीवर अशाच प्रकारे अतिक्रमण आणि बनावट कागदपत्रांद्वारे मालकी हक्क मिळवण्याचे प्रकार घडले असून, प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेत असल्याची टीका होत आहे. शासनाने यासाठी वेळोवेळी परिपत्रक आणि न्यायालयीन आदेश जारी केले असूनही, देवस्थान जमिनी संदर्भातील समित्या कार्यरत नसल्याचेही उघड झाले आहे.

**तक्रारदाराचे म्हणणे**

या प्रकरणात सतत पाठपुरावा करून सत्य समोर आणणाऱ्या तक्रारदार रामनाथ खोड यांनी आणखी एक देवस्थान जमीन मुक्त करून समाजपुढे आदर्श ठेवला आहे. त्यांच्यामुळे मंदिराची ६५ एकर जमीन पुन्हा ट्रस्टच्या ताब्यात आली.

**रक्षकच भक्षक झाले आहेत**

देवस्थान जमिनींचे रक्षण करण्यासाठी प्रशासनाची अधिक जबाबदार भूमिका आवश्यक आहे. बनावट फेरफार, महसूल कर्मचाऱ्यांची मिलीभगत आणि पोलिसांची उदासीनता यामुळे अशी प्रकरणं वाढत आहेत. श्री लक्ष्मीनारायण मंदिर ट्रस्टच्या प्रकरणात न्याय मिळाल्याने अन्य देवस्थानांसाठी एक नवा मार्ग मोकळा झाला आहे.

– रामनाथ खोड

## युसूफवडगाव येथे शेतकऱ्यांचा विविध मागण्यांसाठी रास्ता रोको

**युसूफवडगाव । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे काल शेकापच्या वतीने शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी व शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई देण्यासाठी रास्त रोको करण्यात आला.



ऑगस्ट सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी झाल्याने केज तालुक्यातील सर्वच महसूल मंडळातील सर्वच शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे यात सोयाबीन मूग उडीद कापूस व विविध फळबागांचे १००% नुकसान झाले आहे.अतिवृष्टीमुळे जमिनी खरडून गेल्या आहेत.तसेच घरांचे पशु निवाऱ्याचे सुद्धा खुप नुकसान झाले आहेत शेतकऱ्यांची जनावरे वाहुन गेले तर काही जागीच मरण पावले आहेत.अश्या अस्मानी संकटामुळे शेतकरी अडचणीत आला आहे.पुढील शेतीचा खर्च मुलांचे शिक्षण,मुलीचे लग्न,वार्षिक घर खर्च कसा भागवायचा असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.त्यामुळे शासनाने पंजाब सरकारच्या धर्तीवर सरसकट शेतकऱ्यांना हेक्टरी पन्नास हजार रुपये मदत करावी,शेतकऱ्यांची सरसकट

◀◀ पान २ वर



## खाटीक समाजाच्या वतिने पूरग्रस्त शेतकऱ्यांना पशुधन वाटपाचा उपक्रम

गेवराई प्रतिनिधी

राज्य मुस्लिम खाटीक समाज सेवा संस्था, महाराष्ट्र राज्य मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये अलीकडे आलेल्या भीषण पुरामुळे शेकडो शेतकऱ्यांचे जनावरांचे, घरांचे व शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. या कठीण परिस्थितीत आपल्या समाजभावनेतून आणि मानवी कर्तव्य म्हणून राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष हाजी अरफात शेख यांच्या शुभहस्ते पूरग्रस्त शेतकऱ्यांना पशुधन (बकरी/गोमाता/अन्नधान्य किट) वाटपाचा सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.हा कार्यक्रम हा फक्त मदतीचा नव्हे, तर समाजातील संवेदना आणि ऐक्य व्यक्त करणारा प्रयत्न आहे.दिनांक: ०६ ऑक्टोबर २०२५

वेळ: सकाळी ११:०० ते दुपारी २:०० हिरापूर, पिंपळगाव, तालुका – गेवराई, या कार्यक्रमाचे सामाजिक महत्त्व लक्षात घेता. आपण सर्व मान्यवर उपस्थित रहाणार असल्याचे जावेद कुरेशी यांनी दिली.

## मेंगडेवाडी ग्रामस्थांचा रस्त्यासाठी राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील वाघिरा ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या सुमारे ९०० लोकसंख्या असलेल्या मेंगडेवाडी गावाला स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत डांबरी रस्ता मिळालेला नाही. त्यामुळे ग्रामस्थांना दरवर्षी पावसाळ्यात मोठ्या संकटांचा सामना करावा लागत आहे.




रस्ता नसल्याने ग्रामस्थांना दूध–दुभते विक्रीसाठी, बाजारहाट, दवाखाना तसेच विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी तलावाच्या सांडव्यातून जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. पालकांना दररोज लेकरांना शाळेत पाठवताना जीव मुठीत धरावा लागतो.

ग्रामस्थांनी गेल्या अनेक वर्षांपासून लोकप्रतिनिधींपासून मंत्र्यांपर्यंत रस्त्याची मागणी केली. निवेदने, आंदोलन, आणि पाठपुरावा करूनही फक्त आश्वासनांचीच बरसात झाली, प्रत्यक्षात काम काहीच झाले नाही.त्यामुळे ग्रामस्थांचा संताप उसळला असून, अखेर आज सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. आज दिनांक ०६ ऑक्टोबर,

◀◀ पान २ वर

## डॉ.योगेश क्षीरसागरांची पालकमंत्री अजित पवार यांच्यासमवेत पूरग्रस्तांच्या समस्येवर चर्चा

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मुंबई येथे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांची सोमवारी (दि.६) भेट घेऊन विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा केली. यावेळी बीड व शिरूर कासार तालुक्यातील आपत्तीग्रस्त भागांचे पुनर्वसन, विकास प्रकल्प आणि आगामी स्थानिक निवडणुका या विषयांवर सखोल चर्चा झाली.



बीड तालुक्यातील कपिलधारवाडी

◀◀ पान २ वर

### नाट्य गृहाच्या नूतनीकरणासाठी ठोक तरतूद हेडमधून मिळणार साडेआठ कोटींचा निधी

बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या नूतनीकरणासाठी नगरविकास विभागाच्या ठोस तरतूद हेडमधून नाट्यगृह उभारण्यासाठी लवकरच साडेआठ कोटींचा निधी उपलब्ध करून देण्याचा सकारात्मक निर्णय अजितदादांनी घेतल्याचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले.

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत झाली चर्चा

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत डॉ.योगेश क्षीरसागर व अजितदादा पवार यांच्यात सविस्तर चर्चा झाली. यावेळी अजितदादांनी मार्गदर्शन केले असून पूर्ण ताकदीने निवडणुका लढविल्या जाणार आहेत.

## काटेंगे नहीं, बाटेंगे! हाजी अरफात शेख यांनी दाखवली माणुसकीची मशाल, पूरग्रस्तांना दिलं नवजीवन

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील कानडा पिंपळगाव येथे राज्य मुस्लिम खाटीक समाज सेवा संघटनेच्या वतीने पूरग्रस्त शेतकऱ्यांना पशुधन वाटप कार्यक्रमात मानवतेचा अनोखा संदेश झळकला. या कार्यक्रमाचे नेतृत्व राज्य मुस्लिम खाटीक समाज सेवा संघटनेचे अध्यक्ष आणि भाजपा ट्रान्सपोर्ट सेलचे प्रमुख, हाजी अरफात शेख यांनी केले. त्यांच्या ओजस्वी भाषणाने उपस्थितांमध्ये आशा आणि एकतेचा नवा प्रकाश फुलवला.



हाजी अरफात शेख यांनी आपल्या भाषणात सांगितले, “आम्ही कुरैशी बोकड कापणारे आहोत, पण आज काटेंगे नाहीं, बाटेंगे! पूराने भेदभाव केला नाही, मग आम्ही का करू? आम्ही मुस्लिम आहोत, पण आज आम्ही फक्त माणसे आहोत तुमच्या दुःखात सहभागी, तुमच्या संघर्षाचे भागीदार आहोत.त्यांनी पुढे सांगितले, “पूराने शेतकऱ्यांची शेती, जनावरे, संसार वाहून नेले. पण आमचा संकल्प आहे आम्ही त्यांचे जीवन पुन्हा उभे करू. म्हणूनच आम्ही आज प्रत्येक पूरग्रस्त कुटुंबाला बकरी–बोकड, गाय आणि किराणा साहित्य देत आहोत. हे दान नाही, तर आत्मनिर्भरतेकडे जाण्याचा मार्ग आहे.” हाजी अरफात शेख यांनी कार्यक्रमात एक महत्त्वाची घोषणा केली पूरग्रस्त विद्यार्थ्यांचे सर्व शैक्षणिक साहित्य पुराच्या पाण्यात वाहून गेले असल्याने, सर्व लहान मुलांना

◀◀ पान २ वर

## फळरोप वाटिका मजुरांचे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयासमोर अमरण उपोषण सुरू

माजलगाव । प्रतिनिधी

कृषि अधिकारी कृषि चिकित्सालय फळरोप वाटिका व तालुका बीजगुणन केंद्र येथील दैनंदिन रोजंदारी मंजूरी माहे ऑगस्ट २०२२ ते फेब्रुवारी २०२३ या कालावधीत थकीत मजूरी आज पर्यंत मिळालेली नसल्याने तसेच माहे जून २०२४ ते ऑक्टोंबर २०२४ पर्यंत मजूरी सुध्दा आजतागायत मिळालेली नसल्याने फळरोप वाटिका मजुरांनी दि ०६ ऑक्टोबर सोमवार रोजी पासून जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी बीड यांच्या कार्यालया समोर आमरण उपोषण सुरू केले आहे.




सदरील उपोषण कर्त्यांचे म्हणणे आहे की,आम्ही घरामध्ये कर्ता असल्याने कूटूंबाची सर्वस्वी जवाबदारी आमच्यावर आहे.मुलाबाळाचे शिक्षण, आई–वडिल वयस्कर असल्याने त्यांना वेळोवेळी दवाखाना व औषधी उपचाराची आवश्यकत्ता असते घरामध्ये आडी–आडचणीचा सामना करणे.जिक्रीचे झाले असून आमच्यावर उपाषमारीची वेळ आलेली आहे.तरी विनंती की आमच्या हक्काचे वेतन मिळवून द्यावे या पुर्वी कृषि आयुक्तालय पुणे व विभागीय कृषि सहसंचालक संभाजीनगर, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी बीड, उपविभागीय कृषि अधिकारी माजलगांव यांना तोंडी व लेखी कळवूनही त्यांनी आजतागायत आमच्या थकीत वेतनाबाबत दखल घेतलेली नाही.त्या मुळे आम्ही गणेश थोरात,तुंकाराम निसर्गध व मंहानदाबाई नवले आदींनी दि ०६ ऑक्टोबर सोमवार रोझी पासुन हे उपोषण सुरू केले आहे.

## पाणंद रस्त्याचे काम न करताच पैसे उचलले

**आष्टी । प्रतिनिधी**

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत भगवान बाबा मंदिर ते जुना कासारी पाणंद रस्ता या रस्त्याचे काम झालेले नाही तरी देखील या रस्त्याचे उचलण्यात आले असून या कामाची चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी अशोक जरांगे, दिलीप जगताप, शशिकांत जरांगे, शैलेश जरांगे, टेभू भोसले, संकेत राऊत, निलेश जरांगे यांनी तहसीलदार आष्टी यांच्याकडे केली आहे. ३ ऑक्टोबर रोजी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की २३ जानेवारी २०२२ ते १७ जुलै २०२२ या कालावधीत ४,६०,२२४ रुपये महात्मा गांधी रोजगार हमी अंतर्गत उचलण्यात आलेले आहेत हा रस्ता २४ लाख ९४ हजार १३५ रुपयांचा आहे. या रस्त्याचे काम झालेले नाही सदरील सत्ता जरांगे वस्ती राऊत वस्ती येथील लोकांसाठी हा महत्त्वाचा व एक वाहतुकीचा रस्ता असून दुसरा कोणताच पर्यायी रस्ता नाही दळणवळणासाठी प्रचंड त्रास होत आहे. सरपंचांना विनंती करून तहसिलदारांनी सुद्धा तक्रारीचे निवारण केले नाही ग्रामस्थांनी वर्गणी करून रस्ता असे म्हणणे आहे. या रस्त्या कामासाठी पैसे उचलले आहेत याची चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी निवेदन देताना राम खाडे यांच्या सह ग्रामस्थ महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## गोदाकाठच्या गावांसाठी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.विकास अंबटी सरसावले




तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील राहेरी येथे पूरग्रस्त गावातील जणावरांसाठी कार्यमोहीम शिबिर आयोजित करण्यात आले होते. तशेच लाळ, खूरकुत रोगाचे लसीकरण करून जंतनाशक वाटण्यात आले.

या वेळेस डॉ. वि.एस.अंबटी पशुधन विकास अधिकारी (वि), पंचायत समिती गेवराई, संदीप डोईफोडे (पशुधन पर्यवेक्षक), तुषार मरकड (पशुधन पर्यवेक्षक), अनिल लाड (पशुधन पर्यवेक्षक) व विवेक हात्ते (पशुधन पर्यवेक्षक) हे उपस्थित होते.

अतिवृष्टी आलेल्या पुरामुळे घराचे पूर्णपणे नुकसान झाले. पूरग्रस्तांचे घरात पाणी शिरले. संसारोउपयोगी सारे उध्वस्त झाले. शेतकरी राजाला मदत करणारे होते, पण शेतकरी राजा आपल्या शेतीचा मालपीक येतो पशुधन म्हणजे शेतकरी राजाचा एक धन आहे. त्याच्या जीवावर शेतकरी राजा शेती करतो आज त्या पशुधनाच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी लंपीचा आजार असो ढाळ उलटी किंवा निमोनिया दुसरे आजार भौतिक आजार होऊ नये यासाठी काळजी घेणारे डॉ. वि.एस.अंबटी यांनी शिबीर

◀◀ पान २ वर

## अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने आष्टी तालुक्यातील पूरग्रस्तांना मदत

आष्टी । प्रतिनिधी

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) आणि स्टुडन्ट फॉर सेवा बीड यांच्या वतीने आष्टी तालुक्यातील देव देवळा, पानाची देवळाली, धामणगाव या गावांमध्ये पूरग्रस्त बांधवांसाठी मदतकार्य राबविण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी आणि स्वयंसेवकांनी आपल्या हातांनी प्रेमाने तयार केलेली जीवनावश्यक वस्तूंची, कपड्यांची आणि शैक्षणिक साहित्याची किट्स गरजूंपर्यंत पोहोचवण्यात आली.



या मदतकार्यात एकूण २६६ पूरग्रस्त नागरिक व विद्यार्थ्यांना थेट सहाय्य करण्यात आले.

जीवनावश्यक किटमध्ये गहू, तांदूळ, डाळी, साखर, तेल, मसाले, पोहे, चहा पावडर, शेंगदाणे, जिरे, मसाले, बेसन पीठ यांसारख्या दैनंदिन वापराच्या वस्तूंचा समावेश होता. तसेच प्रत्येक कुटुंबाला दोन साड्या, दोन शर्ट, दोन पॅन्ट, लहान मुलांचे कपडे, मुलींचे कपडे आणि एक बेडशीट असलेली कपड्यांची किट देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांसाठी कॉलेज बॅग, पेन्सिल, पेन, वह्या, खोडरबर, शार्पनर अशा वस्तूंची शैक्षणिक किट वाटप करण्यात आली. या सर्व साहित्याचे संकलन अभाविपच्या कार्यकर्त्यांनी विविध महाविद्यालयांतून विद्यार्थ्यांकडून प्रेम, संवेदनशीलता आणि जबाबदारीची भावना जपत केले. या वेळी

◀◀ पान २ वर

## संभाजीनगरच्या हंबरडा मोर्चाच्या पुर्वतयारी बैठकीस उपस्थित रहा - वरेकर ,गिराम

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्यातील सर्वच आठही जिल्ह्यांमध्ये निसर्ग कोपला असुन , अस्मानी व सुलतानी संकटात शेतकरी सापडला आहे, शेतकऱ्यांना कसं जीवन जगावं हे कळेनासे झाले आहे अशा परिस्थितीत शेतकरी पुन्हा उभा राहिला पाहिजे, त्याला सरसकट मदत झाली पाहिजे, हेक्टरी ५०,००० हजार रुपये मदत मिळाली पाहिजे अशा विविध मागण्यांसंदर्भात शिवसेना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वात व शिवसेना नेते तथा माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब व इतरही शिवसेना नेते यांच्या उपस्थितीत मराठवाड्याची राजधानी संभाजीनगर येथील आयुक्त कार्यालयावर शेतकऱ्यांनचा भव्य हंबरडा मोर्चा धडकणार आहे याची पुर्वतयारी करण्यासाठी बीड जिल्हातून मोठ्या संख्येने शेतकरी व पदाधिकारी घेऊन जायचे आहे , मोर्चाच्या संदर्भात शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादासजी दानवे साहेब उद्या मंगळवार दि. ७/१०/२०२५ रोजी दुपारी ठिक ३ वाजता बीड शहरातील तहसील कार्यालयासमोर हॉटेल नीलकमल येथे पदाधिकारी व शिवसैनिक यांना मार्गदर्शन करण्यासाठी येणार आहेत तरी सहाही विधानसभा क्षेत्रातील शिवसेना माजी/आजी पदाधिकारी, महिला आघाडी, युवासेना, किसान सेना व शिवसैनिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व जिल्हाप्रमुख उल्हास भैय्या गिराम यांनी केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
मंगळवार, दि.०७ ऑक्टोबर २०२५ । पान ७

# गुंड नीलेश घायवळच्या घराची झडती काडतुसे, दहा तोळे सोने, रोकड जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

**कोथरूड गोळीबार प्रकरणात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई करण्यात आलेला गुंड नीलेश घायवळ याच्या घरातून पोलिसांनी दोन काडतुसे, तसेच चार पुंगळ्या जप्त केल्या आहेत. तर धाराशिव, पुणे, मुळशी, जामखेड येथील जमिनीच्या संदर्भातील खरेदीखत, साठेखतासह इतर कागदपत्रेदेखील मिळून आली आहेत. घायवळ सध्या विदेशात फरार आहे.**

पिस्तुलाचा कोणताही वैध परवाना नसताना देखील घायवळ याने बेकायदा काडतुसे घरात बाळगल्याचे समोर आले आहे. याबाबत सहायक पोलिस निरीक्षक रवींद्र आळेकर यांनी कोथरूड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, घायवळ याच्याविरुद्ध शस्त्र अधिनियम १९५१ चे कलम ५, ७, २५ (१), २७ (२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घायवळ याच्यावर मकोकाअंतर्गत कारवाई करण्यात आल्यानंतर कोथरूड पोलिसांनी त्याच्या शास्त्रीनगर कोथरूड येथील श्री संत ज्ञानेश्वर कॉलनीतील घरी शनिवारी (दि. ४) दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास झडती घेतली. त्यावेळी त्याच्या घरातील कपाटातून दोन काडतुसे आणि चार पुंगळ्या जप्त करण्यात आल्या. पोलिसांना त्याच्या घरात धाराशिव, जामखेड, पुणे आणि मुळशी येथील जमिनीच्या संदर्भातील कागदपत्रे मिळून आली आहेत. त्यामध्ये खरेदीखत आणि साठेखतांचा समावेश असल्याचे पोलिस उपायुक्त संभाजी कदम यांनी सांगितले.

कदम म्हणाले, त्याच्या घरात दहा तोळे सोन्याचे



दागिने मिळून आले आहेत. त्याच्या कार्यालयाची देखील पोलिसांनी झडती घेतली असून, काही कागदपत्रे हाती लागली आहेत. मालमत्तेच्या संदर्भातील सर्व कागदपत्रे पोलिसांकडून तपासली जात आहेत. या वेळी पोलिसांचा मोठा फौजफाटा घायवळच्या घराच्या परिसरात तैनात केला होता. सहायक पोलिस आयुक्त भाऊसाहेब पठारे, कोथरूड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप देशमाने यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिस उपनिरीक्षक नेमाणे तपास करत आहेत.

घायवळ टोळीतील गुंडानी दोन व्यक्तींवर हिंसक हल्ला केल्याप्रकरणी, दोन स्वतंत्र गुन्हे कोथरूड पोलिसात दाखल आहेत. नीलेश घायवळ याच्यासह दहा जणांवर मकोकाअंतर्गत कारवाई केली आहे. पोलिसांकडून घायवळचा शोध घेतला जात असतानाच, तो ११ सप्टेंबरपासून परदेशात असल्याची माहिती समोर आली. घायवळ हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असताना त्याला पासपोर्ट मिळालाच कसा, असा प्रश्न त्यामुळे उपस्थित झाला. त्या दृष्टीने तपास केला जात असताना, त्याने अहिल्यानगर येथील पत्त्यावर पासपोर्ट काढल्याचे पुढे आले. तो पासपोर्ट काढताना त्याने गायवळ नावाने प्रक्रिया केल्याचे निष्पन्न झाले. त्याच्या आधारकार्डसह इतर काही कागदपत्रावर त्याने नीलेश घायवळ न लावता नीलेश गायवळ असे नाव लावल्याचे दिसून आले.पुणे पोलिसांनी याबाबत अहिल्यानगर पोलिसांकडून नुकतीच माहिती घेतली असून, पासपोर्ट विभागाला ही माहिती देऊन त्याचा पासपोर्ट रद्द करण्याची प्रक्रिया पोलिसांनी सुरू केली आहे. घायवळचे वास्तव्य सध्या स्विझर्लंडमध्ये असल्याची माहिती आहे. घायवळ, तसेच त्याच्या कुटुंबीयांचे आर्थिक स्रोत पोलिसांनी तपासण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार घायवळ, त्याच्या कुटुंबीयांची दहा बँक खाती गोठविण्यात आली असल्याचे वरिष्ठ पोलिस अधिकार्यांनी सांगितले.

# निरा डावा कालवा अस्तरीकरणाला शेतकऱ्यांचा विरोध; ठेकेदाराने काम थांबवले



बारामती । प्रतिनिधी

काटेवाडी (ता. बारामती) परिसरातील मासाळवाडी येथे निरा डावा कालव्याच्या अस्तरीकरणाच्या कामाला स्थानिक शेतकऱ्यांनी विरोध करत रविवारी (दि. ५) सकाळी काम थांबवले. ठेकेदाराने शेतकऱ्यांशी कोणतीही चर्चा न करता काम सुरू केल्याने ग्रामस्थांमध्ये प्रचंड नाराजी उसळली. पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहात बदल होऊन पिण्याच्या पाण्याची टंचाई व शेतीला धोका निर्माण होईल, अशी भीती व्यक्त करत शेतकऱ्यांनी ठाम भूमिका घेतली.

मासाळवाडी भागात कालव्याच्या अस्तरीकरणाचे काम सुरू असताना, स्थानिक शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने घटनास्थळी एकत्रित झाले. त्यांनी ठेकेदाराला काम तात्काळ थांबविण्याचा इशारा दिला आणि शेतकऱ्यांना विश्वासात घेतल्याशिवाय पुढील कामाला परवानगी नसल्याचे स्पष्ट केले. या आक्रमक भूमिकेमुळे ठेकेदाराच्या सुपरवायझरने काम बंद करण्याचा निर्णय घेतला. अस्तरीकरणामुळे कालव्याचा नैसर्गिक प्रवाह बाधित होईल, ज्यामुळे भागातील विहिरी, कूपनलिका व शेतजमिनींना पाणीटंचाईचा सामना करावा लागेल, असे शेतकऱ्यांनी सांगितले.ठेकेदाराने पुन्हा काम सुरू केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. या वेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख बाळासो शिंदे, ग्रामपंचायतीचे सदस्य अजित काटे, सागर मासाळ, तंटामुक्तीचे अध्यक्ष हरिश्चंद्र मासाळ, रणजित गायकवाड, बलभीम मासाळ, संपतराव मासाळ, राहुल ठोंबरे, सोमनाथ मासाळ, अनिल निगडे, बंटी मासाळ यांसह शेकडो शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार आता विभागीय अधिकाऱ्यांशी चर्चा होण्याची शक्यता आहे.

# मान्यवरांचा सहभाग असलेल्या साहित्यिक चर्चेतून उलगडणार मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीचा प्रवास

### अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त महापालिकेच्या वतीने खास महिला व विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन





**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिका आयोजित तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखा व महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखा यांच्या सहकार्याने आणि महापालिकेचे श्री भैरवनाथ सार्वजनिक ग्रंथालय, भोसरी व हुतात्मा चाफेकर सार्वजनिक ग्रंथालय, चिंचवड यांच्या सहभागातून ३ ऑक्टोबर २०२५ रोजी अभिजात मराठी भाषा दिवस तसेच ३ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्यात येणार आहे, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

यानिमित्त शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय साहित्यिक चर्चा, गझल, अभंग, भजन, कवी संमेलन, सांस्कृतिक कार्यक्रम, ग्रंथ प्रदर्शने, मराठी चित्रपट कलाकारांशी हितगुज, पोवाडे, बालनाट्य एकांकिका, मराठी वेशभूषा, लोककला कार्यक्रम आणि नाट्यप्रयोग अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त सिंह यांनी केले आहे.

अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्याचा उद्देश मराठी भाषेची अभिजात परंपरा, तिचे समृद्ध साहित्य व सांस्कृतिक वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे हा आहे. यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या लोककला, नाट्यप्रयोग, अभिवाचन, गझल गायन, व्याख्यान अशा विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून मराठी भाषेची सखोल ओळख नव्या पिढीला करून देण्याचा प्रयत्न आहे. शालेय विद्यार्थ्यांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांना या कार्यक्रमांत सहभागी होता येईल, यादृष्टीने सप्ताहातील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी दिली.

# शिरूर नगरपरिषदेत नगराध्यक्षपद 'ओबीसी महिलासाठी राखीव; प्रभागनिहाय आरक्षण ८ ऑक्टोबरला

शिरूर । प्रतिनिधी

राज्यातील नगरपरिषदांच्या नगराध्यक्षपदाच्या आरक्षण सोडतीत शिरूर नगरपरिषदेचे पद ओबीसी (इतर मागासवर्गीय) महिलासाठी राखीव ठरले आहे. यामुळे शिरूरमध्ये पुन्हा एकदा महिला नेतृत्वाचा काळ येणार असून, राजकीय वातावरण तापले आहे. प्रभागनिहाय आरक्षणाची सोडत ८ ऑक्टोबरला जाहीर होणार असल्याने इच्छुकांच्या हालचालींना वेग आला आहे.

मुंबईत आज (६ ऑक्टोबर) पार पडलेल्या सोडतीत शिरूर ओबीसी महिलांसाठी राखीव ठरल्याची पुष्टी झाली. मागील तीन पंचवार्षिक काळात महिलांनीच नगराध्यक्षपद भूषवले असल्याने यंदाही 'महिलाराज' पाहायला मिळणार आहे. मुख्याधिकारी प्रीतम पाटील यांनी सांगितले, की प्रभागनिहाय आरक्षणाची सोडत ८ ऑक्टोबरला नगरपरिषद सभागृहात होईल. नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

शिरूर नगरपरिषदेत यंदा नगरसेवकांची संख्या २१ वरून २४ वर वाढली असून, थेट जनतेतून निवडणाऱ्या नगराध्यक्षासह एकूण २५ सदस्य असतील. अनेक वर्षांपासून उद्योगपती प्रकाशभाऊ धारिवाल यांच्या शिरूर




विकास आघाडीचे वर्चस्व असले तरी ओबीसी महिला आरक्षणामुळे नवीन समीकरणे तयार होत आहेत. नवीन प्रभागरचना, वाढलेली पदे आणि स्थानिक असंतोषामुळे निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता आहे.

आरक्षण जाहीर होताच शहरात इच्छुक महिलांची संख्या वाढली आहे. यामध्ये माजी नगराध्यक्षा सुवर्णाताई लोळगे, माजी नगरसेविका अलकाताई खांडरे, माजी नगराध्यक्षा सुनीता कालेवार, माजी नगरसेविका मनीषा कालेवार, रोहिणी बनकर, ऐश्वर्या अभिजित पाचर्णे, मनीषा गावडे, अलकाताई सरोदे, सुवर्णा लटांबळे, सोनिया दसगुडे, सुरेखा शितोळे, अंजली थोरात यांसारख्या नावांचा समावेश आहे. काही नवीन चेहऱ्यांना राजकारणात संधी मिळण्याची शक्यता आहे.गेल्या चार वर्षांत प्रशासकीय कारभार चालू असताना आता निवडणुकीच्या तयारीने शहर राजकीय रंगाने न्हाऊ लागले आहे. बॅनर, पोस्टर आणि बैठकींची लगबग सुरू असून, पुरुष नेत्यांमध्ये नाराजी दिसत असली तरी महिलांमध्ये उत्साह आहे.शिरूर नगरपरिषदेच्या इतिहासात पुन्हा एकदा महिला नेतृत्वाचा अध्याय लिहिला जाणार आहे. ओबीसी महिला आरक्षणामुळे नव्या चेहऱ्यांना राजकारणात संधी मिळण्याची दाट शक्यता आहे. येत्या काही दिवसांत शिरूरचे राजकारण नव्या रंगात न्हाऊन निघेल, इतके मात्र नक्की.

# आनंद पाटील यांची पूरग्रस्त भागातील नागरिकांना मदत



लोहारा । प्रतिनिधी


लोहारा तालुक्यातील हिप्परगा रवा येथील अतिवृष्टीमुळे घर पडल्यावर संकटात सापडलेल्या कुटूंबाला युवासेना धाराशिव लोकसभा अध्यक्ष आनंद पाटील यांनी भरीव मदत केली आहे. यापुर्वी त्यांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली होती.

लोहारा तालुक्याला यावर्षी पावसाने चांगलेच झोडपून काढले आहे. यात तालुक्यातील अनेक घरांची पडझड झाली. पिके पाण्याखाली जावून पिकांसह शेतजमिनीचे प्रचंड नुकसान झाले आहे.या नुकसानीची पाहणी करण्यासाठी अनेक लोकप्रतिनिधी, विविध राजकीय पदाधिकारी, सामाजिक संस्था यांनी पाहणी केली. त्यांना प्रत्यक्ष मदत मात्र तुरळक लोकांनी केली. यामध्ये लोहारा तालुक्यातील भातागळी गावचे सुपुत्र तथा युवा सेना धाराशिव लोकसभा अध्यक्ष आनंद पाटील यांनी पहील्या टप्यात तालुक्यातील नुकसानीची पाहणी केली होती. त्यानंतर हिप्परगा रवा येथील गरीब कुटूंब असलेल्या रियाज रफिक मुलानी यांना युवासेनेचे कार्यकर्ते तथा आनंद पाटील समर्थक प्रशांत थोरात यांच्या मार्फत आनंद पाटील यांनी भरीव आर्थिक मदत केली आहे. या मदतीचा आकडा मात्र जाहीर करण्यास नकार दिला असला तरी मदतीचा आकडा मोठा असल्याचे बोलले जात आहे. रविवारी (दि.५) रात्री ८:०० वाजता प्रशांत थोरात यांनी रियाज मुलानी यांच्या परिवाराला ती मदत पोहोच केली. यावेळी शंभो वाले, वामन मोरे, आपासाहेब पाटील, आपासाहेब मुळे, कोंडीबा जाधव, बालाजीआबा मुळे,सुनील जाधव,विनोद मोरे,विकास मोरे,विकास नरगाळे ,महेश सुतार, बालाजी जाधव,समाधान मुळे,सुनील मुळे,दत्तात्रय मुळे यांच्या सह नागरिक उपस्थित होते.

# गौतमी पाटीलला अपघातप्रकरणात पुणे पोलिसांकडून क्लीन चिट

पुणे । प्रतिनिधी

प्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटील यांच्या कारने ३० सप्टेंबरला वडगाव बुद्रुकजवळ रिक्षाला धडक देणाऱ्या अपघातप्रकरणात पुणे पोलिसांनी तिला पूर्णपणे क्लीन चिट दिली आहे. अपघातावेळी गौतमी वाहनात



नव्हती, फक्त चालक उपस्थित होता, असा निष्कर्ष निघाला असून, या निष्कर्षासाठी पोलिसांनी १०० हून अधिक सीसीटीव्ही फुटेज तपासले.

रिक्षाचालक समाजी विठ्ठल मारगळे (४४) गंभीर जखमी झाला असून, तो दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात उपचार घेत आहे. या घटनेने गौतमीवर राजकीय आणि सोशल मीडिया वाद उफाळला होता, पण आता पोलिसांच्या तपासाने तिला मोठा दिलासा मिळाला आहे. पुणे पोलिस उपायुक्त संभाजी कदम यांनी स्पष्ट केलं की, अपघातावेळी गौतमी पाटील वाहनात नव्हती. अपघातस्थळापासून भोरपर्यंतच्या ४०-५० ठिकाणी असलेल्या १०० हून अधिक फुटेजचा तपास केला. त्यात फक्त चालक वाहन चालवत असल्याचं दिसतंय.अपघातापूर्वी दोन व्यक्ती वाहनातून उतरल्या होत्या, पण त्यांचा अपघाताशी काही संबंध नाही. पोलिसांनी गौतमीला कोणताही नोटीस जारी केली नाही, तर चालकाला नोटीस देऊन चौकशीसाठी बोलावलं आहे. अपघातानंतर तांत्रिक बाबी आणि विमा दाव्यासाठी गौतमीचं जबाब घेतलं जाईल, पण तिच्यावर कोणतीही कारवाई नाही, असं पोलीस उपयुक्त यांनी म्हटले,

# जिल्ह्यातील चार नगरपरिषदा, तीन नगर पंचायतींचे नगराध्यक्षपद महिलांसाठी राखीव

पुणे । प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल वाजले आहे. राज्यातील २४७ नगरपरिषदा आणि १४७ नगरपंचायतींच्या नगराध्यक्षपदाच्या आरक्षणाची सोडत सोमवारी (दि. ६) जाहीर झाली. पुणे जिल्ह्यातील १४ नगरपरिषदांपैकी ४ ठिकाणी आणि ४ नगरपंचायतींपैकी ३ ठिकाणी नगराध्यक्षपदावर महिला विराजमान होणार आहेत. तर, दोन ठिकाणी अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गासाठी नगराध्यक्षपद राखीव राहणार आहे. आठ नगरपरिषदांची नगराध्यक्षपदे सर्वांसाठी खुली आहेत.




स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जानेवारीपूर्वी घ्याव्यात, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले होते. त्यानंतर प्रशासनाने वेगाने तयारी सुरू केली आहे. नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी मंत्रालयात आरक्षणाची ही सोडत काढण्यात आली.

पुणे जिल्ह्यातील दौंड, शिरूर आणि जुन्नर येथील नगरपरिषदांचे नगराध्यक्षपद इतर मागासवर्गीय (ओबीसी) महिलांसाठी राखीव राहणार आहे. तर चाकण नगरपरिषदेचे नगराध्यक्षपद खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव असेल. त्यामुळे या चार नगरपरिषदांमध्ये महिला राज असणार आहे. फुरसुंगी- उरळी देवाची आणि लोणावळा नगरपरिषदांचे नगराध्यक्षपद अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव झाले आहे.यंदा पुणे जिल्ह्यात मंचर, माळेगाव आणि वडगाव मावळ या नगरपंचायतींच्या निवडणुका होणार आहेत. यापैकी मंचर नगरपंचायतीचे नगराध्यक्षपद इतर मागासवर्गीय (ओबीसी) महिलांसाठी राखीव राहील, तर वडगाव मावळ नगरपंचायतींची नगराध्यक्षपदे खुल्या प्रर्वगातील महिलेसाठी खुले राहणार आहे. याचबरोबर माळेगाव नगरपंचायतीचे नगराध्यक्षपद अनुसूचित जातीसाठी राखीव राहणार आहे.


# अवघ्या २५ दिवसाचा संसार करणाऱ्या आयटी दांपत्याचा घटस्फोट

पुणे । प्रतिनिधी

स्वभाव, राहणीमान तफावतीमुळे लग्नानंतर अवघ्या २५ दिवसातच वेगळे राहणाऱ्या दांपत्याचा घटस्फोट दोन तारखांमध्ये झाला. २६ सप्टेंबर रोजी दाखल केलेला दावा दुसऱ्या तारखेला ४ ऑक्टोबर रोजी निकाली काढण्यात आला.

कौटुंबिक न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश एस.एस.रुकमे यांनी हा निकाल दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय-निवाड्यानुसार परस्पर संमतीने घटस्फोटाचा दावा दाखल करण्यापूर्वी दोघे वेगळे राहत असल्यास सहा महिन्याचा कालावधी वगळता येतो.

मात्र, या प्रकरणात दोघे सुमारे १ वर्षे वेगळे राहत आहेत. न्यायालयात झालेल्या समुपदेशनात दोघे एकत्र येण्याची शक्यता नसल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे हा कालावधी वगळण्याची मागणी अर्जदार वकिलांनी केली.



त्यानुसार न्यायालयाने हा निकाल दिला आहे.

माधव आणि माधवी (नावे बदलली आहेत) अशी त्या दोघांची नावे आहेत. दोघांनी ॲड. मंगेश कदम आणि ॲड. सुमेद जोगदंड यांच्यामार्फत कौटुंबिक न्यायालयात परस्पर संमतीने घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला होता. दोघेही आयटी क्षेत्रात इंजिनिअर आहेत. तो २७ तर ती २६ वर्षांची आहे. पारंपारिक पध्दतीने पाहणी करून ७ जुलै २०२४ रोजी दोघांचा विवाह झाला. मात्र, वैचारिक मतभेदामुळे दोघांचे पटेनासे झाले.

२५ दिवस संसार केल्यानंतर वाद विकोपाला गेल्याने दोघे वेगळे राहू लागले. आता एकत्र येणे शक्य नसल्याने दोघांनी परस्पर संमतीने घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला. न्यायालयात झालेल्या समुपदेशनात दोघे एकत्र येणे शक्य नसल्याने निष्पन्न झाले. त्यामुळे घटस्फोटाचा दावा न्यायालयाने मंजुर केला. निकालानुसार दोघात स्त्रीधन, इतर दागदागिने, पैसे आणि संसार उपयोगी साहित्यावरून कोणतेही वाद नाहीत.

# प्रभाग रचना भाजपच्या बाजूने ? पेठांमध्ये छोटे, उपनगरांत मोठे प्रभाग

पुणे । प्रतिनिधी

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा (पीएमआरडीए) विकास आराखडा रद्द झाला आहे. त्यामुळे पालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांसाठी नियोजन प्राधिकरण म्हणून पुणे महापालिकेस अधिकार देण्याची मागणी पालिका आयुक्तांनी नगर विकास विभागाकडे केली आहे.३० जून २०२१ च्या शासन आदेशानुसार पुणे महापालिकेच्या हद्दीत म्हाळुंगे, सूस, बावधन बुद्रुक, वाघोलीसह एकूण २३ गावांचा समावेश झाला. या गावांच्या विकासाचे नियोजन करण्यासाठी १४ जुलै २०२१ रोजीच्या अधिसूचनेनुसार पीएमआरडीएला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त करण्यात आले होते.

प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम २६ (१) अन्वये या २३ गावांसह त्यांच्या हद्दीचा प्रारूप विकास आराखडा २ ऑगस्ट २०२१ रोजी प्रसिद्ध केला आणि नागरिकांकडून



हरकती व सूचना मागविल्या. त्यावरील सुनावणीही पूर्ण झाली होती. दरम्यान, या प्रारूप विकास आराखड्याच्या अनुषंगाने न्यायालयात दावा दाखल करण्यात आला होता. न्यायालयातील १५ जुलै २०२५ रोजीच्या सुनावणीदरम्यान प्राधिकरण आणि राज्य शासनाने प्रसिद्ध केलेला प्रारूप विकास आराखडा मागे घेतल्याचे सांगितले होते.

त्यामुळे न्यायालयाने सदरचा दावा निकाली काढला. पीएमआरडीएने प्रारूप विकास आराखडा रद्द केल्याची अधिसूचना मागील आठवड्यात जारी केली. त्यामुळे या २३ गावांच्या विकासाचा प्रारूप आराखडा आता रद्दबातल ठरला आहे. त्यामुळे पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी नगर विकास विभागाचे प्रधान सचिव यांना पत्र लिहून २३ गावांसाठी नियोजन प्राधिकरण म्हणून अधिकार देण्याची मागणी केली आहे.

ही सर्व २३ गावे आता पुणे महापालिकेच्या हद्दीचा भाग आहेत. त्यामुळे या गावांमध्ये पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, रस्ते विकास, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या आवश्यक सेवासुविधांची देखभाल आणि विकासकामे पुणे महापालिकेकडूनच करण्यात येत आहेत. त्यामुळे त्यांचे नियोजन प्राधिकरणाचे संपूर्ण अधिकार पुणे महापालिकेला मिळाल्यास बांधकामास परवानगी देणे, विकसन शुल्क वसूल करणे आणि विकास आराखड्याचे नियोजन करणे पालिकेला शक्य होईल त्यामुळे पीएमआरडीएला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त करणारा १४ जुलै २०२१ रोजीचा शासन आदेश तातडीने रद्द करावा, अशी मागणी केली आहे.

या गावांचे मिळणार अधिकार..

म्हाळुंगे, सूस, बावधन बुद्रुक, किरकटवाडी, पिसोळी, कोंढवे धावडे, कोपरे, नांदेड, खडकवासला, मांजरी बुद्रुक, नऱ्हे, होळकरवाडी, औताडे हांडेवाडी, वडाचीवाडी, शेवाळेवाडी, नांदोशी, सणसनगर, मांगडेवाडी, भिलारेवाडी, निंबाळकरवाडी, जांभुळवाडी, कोल्हेवाडी आणि वाघोली.